لَا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللّٰهِ

# अहमदियत चा संदेश


**लेखक**

हज़रत मिर्ज़ा बशीरूद्दीन महमूद अहमद

अपेक्षित मसीहाचे द्वितीय खलीफा रज़ि




# अहमदियतचा संदेश


**लेखक**

**हज़रत मिर्ज़ा बशीरूद्दीन महमूद अहमद साहेब**

अपेक्षित मसीहाचे दुसरे उत्ताधिकारी[र.जि.]

पुस्तकाचे नाव: अहमदिया चा संदेश
लेखक: हजरत मिर्ज़ा बशीरूद्दीन महमूद अहमद
अनुवादक: डॉ. बशारत अहमद
टाईपिंग व सेटिंग: खान मामून अहमद एतेज़ाज़
प्रकाशन वर्ष: २०२१
संख्या: ५००
प्रकाशक: मुद्रण व प्रकाशन विभाग, कादियान-१४३५१६
जिल्हा गुरदासपूर, (पंजाब)
मुद्रण : फजले उमर प्रिंटींग प्रेस, कादियान, भारत.

Name of the book: Ahmadiyat cha sandesh
Writer: Hazrat Mirza Basheeruddin Mahmood Ahmad
Translator: Dr. Basharat Ahmad
Typing & Setting: Khan Mamoon Ahmed Etyzaz
Edition: 2021
Quantity: 500
Publisher: Nazarat Nashr-o-Isha'at,
Qadian, 143516
Printed at: Fazl-e-Umar Printing Press,
Qadian, Dist. Gurdaspur, (Punjab)
INDIA

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | अहमदियत नवीन धर्म नाही | १ |
| २) | 'खत्मे नबुव्वत' च्या संदर्भात अहमदींची धारणा | ८ |
| ३) | पवित्र कुरआन | ९ |
| ४) | देवदूतांच्या संदर्भात अहमदींची धारणा | ९ |
| ५) | मोक्षाच्या सदंर्भात अहमदींची धारणा | १२ |
| ६) | अहादीस (पैगंबर वचने) वर अहमदींची श्रध्दा | १५ |
| ७) | अहमदींची दैववादा संदर्भात धारणा | १७ |
| ८) | अहमदींची जिहाद संदर्भात धारणा | १९ |
| ९) | नवीन जमाअत स्थापन करण्याचे कारण | २१ |
| १०) | अहमदिया मुस्लिम जमाअतचा कृती कार्यक्रम | ३० |
| ११) | अहमदींना अन्य जमाअती पासून वेगळे ठेवण्याचे कारण | ३२ |

## काहीं संक्षिप्त शब्दः

खालील मराठी मजकूरात आलेल्या अरबी शब्दांचे संक्षिप्त अक्षरे दिलेली आहेत, त्यांचे अर्थ व स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहेत:-

(स.) - हे अक्षर ''सल्लल्लाहु अलैहिवसल्लम'' यांचे संक्षिप्त रूप म्हणून आहे. याचा अर्थ, अल्लाहची कृपा व शांती त्यांना लाभो, असा होतो. हे प्रार्थनात्मक शब्द विशेषकरून श्रेष्ठतम प्रेषित मुहंमद (स.) साठी वापरले जाते.

कलमा - धर्मसुत्र; ''ला इलाहा इल्लल्लाहु मुहम्मदुर्रसूलूल्लाह'' - अल्लाह व्यतिरिक्त कोणीही उपासनेस पात्र नाही आणि मुहंमद (स.) हे त्यांचे प्रेषित आहे.

(अ.स.) - ''अलैहिस्सलाम'' प्रेषित महंमद (स.) यांच्या व्यतिरिक्त जगात प्रकट झालेल्या सर्व प्रेषितांचा नाव उच्चारल्यावर (अ.स.) म्हणतात. याचा अर्थ, त्यांच्यावर अल्लाहची कृपा असो, असा होतो.

(र.जि.) - हे अक्षर ''रज़ियल्लाहु अन्हु'' याचे संक्षिप्त रूप आहे. याचा अर्थ ' अल्लाह त्यांच्यावर प्रसन्न झाला' असा होतो. हे शब्द प्रेषित मुहम्मद (स.) तसेच 'अपेक्षित मसीह व इमाम महदी' यांच्या सोबतींच्या नावानंतर उच्चारले जातात.

# प्रस्ताविक

अहमदिया मुस्लिम जमाअतचे विरोधक सर्व साधारण मुसलमानांमध्ये असा गैरसमज पसरवतात की, अहमदियत हा इस्लाम पासून एक वेगळा धर्म आहे आणि हे की (ईश्वर क्षमा करो) अहमदिया मुस्लिम जमाअतचे संस्थापकांनी, हज़रत महंमद पैगंबर (स.) यांच्या प्रतिस्पर्धेत समांतर असा प्रेषितत्वाचा दावा करून 'खत्मे नबुव्वत' (प्रेषितत्वाची मोहोर) ला नकारले आहे. त्यांचा कलमा (धर्मसूत्र) वेगळा आहे, अहमदी 'जिहाद'ची संकल्पना नकारतात, तसेच इस्लाम विरोधी कटकारस्थानात सामील असतात. वास्तविक पाहता यापैकी एकही गोष्ट खरी नाही, उलट अहमदिया मुस्लिम जमाअतचे संस्थापक हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद क़ादियानी हे हज़रत महंमद पैगंबर (स.) यांचे सच्चेप्रेमी आणि अतितुच्छ दास होते. त्यांची स्थापन केलेली जमाअत खऱ्या इस्लामचे वास्तविक स्वरूप आहे आणि इस्लामच्या प्रतिष्ठेसाठी आणि विश्वप्रभुत्वासाठी रात्रंदिवस कृतीशील आहे.

या पुस्तिकेत वरील सर्व गैरसमजांच्या बाबतीत संक्षेपात आणि सप्रमाण स्पष्टीकरण देण्यात आले असून अहमदिया मुस्लिम जमाअतचे संस्थापक हज़रत मसीह व महदी यांचे दुसरे उत्तराधिकारी हज़रत मिर्ज़ा बशीरूद्दीन महमूद अहमद (र.जि.) यांनी अतिशय सोप्या आणि सरळ भाषेत अहमदिया मुस्लिम जमाअतच्या विश्वव्यापी प्रचार कार्यक्रमाचा खुलासा केला असून, अहमदींना इतर जमाअतींपासून वेगळे ठेवण्याची कारणमीमांसा

देखील केली आहे. ज्यामुळे विवेकशील प्रवृत्तीच्या मुसलमानांना आणि सत्यान्वेषी लोकांना अहमदियतचे हेतू आणि उद्देश समजून घेवून सत्यापर्यंत पोहोचण्यास सहाय्यभूत ठरेल.

परमेश्वराकडे प्रार्थना आहे की, ही पुस्तिका सुध्दा संवेदनशील लोकांसाठी मार्गदर्शक ठरो.

आमीन.

प्रमुख, प्रकाशन व मुद्रण विभाग, कादियान.

बिस्मिल्लाहीर्रहमानिर्रहीम
परमेश्वराच्या नावाने जो परम दयाळू व असीम कृपाळू आहे

# अहमदियतचा संदेश

अहमदियत काय आहे आणि कोणत्या उद्देशाने स्थापन केली गेली आहे? हा एक प्रश्न आहे जो परिचित आणि अपरिचितांच्या मनामध्ये निर्माण होत असतो. परिचितांचा अभ्यास सखोल असतो आणि अपरिचितांचे प्रश्न अतिशयवरवरचे असतात. अज्ञानामुळे त्यांनी अनेक गोष्टी आपल्या मनात ग्रहीत धरलेल्या असतात आणि अनेक गोष्टी अन्य लोकांकडून ऐकून त्यावर विश्वास ठेवलेला असतो. सर्व प्रथम मी याच लोकांच्या माहितीस्तव काहीं गोष्टीं सांगू इच्छितो, जे अज्ञानामुळे आणि माहितीच्या अभावामुळे अहमदियतच्या संदर्भात वेगवेगळया प्रकारच्या गैरसमजांमध्ये गुरफटलेले आहेत.

## अहमदियत कोणताही नवा धर्म नाही

या अल्पज्ञानी लोकांपैकी काहीं असे समजतात की, अहमदी लोक,

لَآ اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللّٰهِ

**(ला इलाहा इल्लल्लाहु मुहम्मदुर्रसूलुल्लाह)** यावर श्रध्दा ठेवत नाहीत आणि अहमदियत एक नवीन धर्म असून हे लोक काहीं अन्य लोकांच्या बहकावन्यामुळे अशी धारणा ठेवतात किंवा त्यांच्या मनामध्ये असे समजून, की अहमदियत एक नवीन धर्म आहे आणि प्रत्येक धर्मासाठी एका वेगळया 'कलमा'ची आवश्यकता आहे, आणि म्हणून समजतात की अहमदींचा पण एक नवीन कलमा आहे; परंतु वस्तुस्थिती ही आहे की, अहमदियत कुठलाही नवीन धर्मही नाही आणि प्रत्येक धर्मासाठी कुठल्याही कलमाची आवश्यकताही नाही, उलट मी असे म्हणतो

की, इस्लाम शिवाय अन्य कोणत्याही धर्माचे 'कलमा' हे वैशिष्ट, वैशिष्टय नाहीच. ज्याप्रमाणे इस्लाम अन्य धर्मांपासून आपल्या ग्रंथामुळे वैशिष्टयपूर्ण आहे, आपल्या प्रेषीतामुळे वैशिष्टयपूर्ण आहे, आपल्या विश्वव्यापीपणा मुळे वैशिष्टयपूर्ण आहे, त्याचप्रमाणे इस्लाम कलमाच्या बाबतीत देखील अन्य धर्मांपेक्षा वैशिष्टयपूर्ण आणि भिन्न आहे. अन्य धर्मांकडे ग्रंथ तर आहेत परंतु ईश्वरीय संदेश मुसलमानांशिवाय अन्य कोणालाही मिळालेला नाही. ग्रंथाचा अर्थ फक्त विषय आहेत, कर्तव्य आहेत, आदेश आहेत; परंतु ग्रंथाच्या अन्वयार्थामध्ये ही गोष्ट अजिबात सामील नाही, की त्यामध्ये नमूद केलेल्या प्रत्येक विषयाचा प्रत्येक शब्द ईश्वराकडून असावा. परंतु इस्लामी ग्रंथाचे नाव ईश्वरीय संदेश (कलामुल्लाह) ठेवण्यात आले आहे. अर्थात त्यातील प्रत्येक शब्द सुध्दा परमेश्वराकडून संदेश रूपाने आलेला आहे. ज्याप्रमाणे यातील विषय परमेश्वरानेच निर्देशित केलेले आहेत. हजरज मूसा (अ.स.) यांच्या ग्रंथाचा विषय तोच होता जो परमेश्वराने निर्देशित केला होता. हज़रत इसा (अ.स.) ची ती शिकवण जी ते जगासमोर सादर करत असत, तीच होती, जी परमेश्वराने त्यांना दिली होती; परंतु ती त्याच शब्दात नव्हती, जे परमेश्वराने वापरले होते. 'तोराह', ' इंजील' आणि 'पवित्र कुरआन' यांचे अध्ययन करणारा, जर त्याचे ध्यान याविषयाकडे आकर्शित केले गेले, तर तो दहा मिनीटाच्या अध्ययनानंतर या निष्कर्षापर्यंत पोहचेल की तोराह आणि इंजिलचे विषय जरी परमेश्वराकडून निर्देशित असले तरी त्यांची शब्द रचना परमेश्वराकडून नाही. त्याचप्रमाणे तो या निष्कर्षापर्यंत देखील पोहचेल, की पवित्र कुरआनातील विषय देखील ईश्वराकडून आहे आणि त्यातील शब्द रचना देखील ईश्वराकडूनच आहे, किंवा ही गोष्ट अशा पध्दतिनेही सांगता येईल की, अशी व्यक्ति ज्याची पवित्र कुरआन, तोराह आणि इंजील या ग्रंथांवर श्रध्दा नाही तो या तिन्ही ग्रंथांचे काही मिनिट अध्ययनानंतर, या गोष्टीला मान्य करण्यास विवश होईल, की तोराह आणि इंजीलला सादर करणारे जरी या गोष्टीचा दावा

करतात, की हे दोन्ही ग्रंथ परमेश्वराकडून आहेत; परंतु त्यांचा दावा असा अजिबात नाही, की या दोन्ही ग्रंथातील प्रत्येक शब्द परमेश्वराने उच्चारलेला आहे. परंतु पवित्र कुरआनाच्या संदर्भात, तो हे मान्य करण्यास विवश होईल, की याचा सादर करता फक्त याच गोष्टीचा दावा करत नाही, की पवित्र कुरआनातील विषय परमेश्वराकडून आहे तर तो या गोष्टीचा ही दावा करतो की पवित्र कुरआनातील एक एक शब्द परमेश्वराचा शब्द आहे. याच कारणाने पवित्र कुरआनाने आपले नाव 'ईश्वरीय ग्रंथ' (किताबुल्लाह) बरोबरच 'ईश्वरीय संदेश' (कलामुल्लाह) सुध्दा ठेवले आहे. परंतु तोराह आणि इंजीलने आपले नाव कलामुल्लाह ठेवलेले नाही आणि पवित्र कुरआनने देखील त्यांना कलामुल्लाह म्हटलेले नाही. म्हणून मुसलमान या बाबतीत अन्य धर्मियांपेक्षा या बाबतीत वैशिष्टपूर्ण आहे, की अन्य धर्माचे धर्मग्रंथ जरी ईश्वरीय ग्रंथ असले तरी ते ईश्वरीय संदेश नाहीत. परंतु मुसलमानांचा ग्रंथ फक्त ईश्वरीय ग्रंथच नसून ईश्वरीय संदेश सुध्दा आहे.

याचप्रमाणे प्रत्येक धर्माची सुरूवात प्रेषीतांच्या व्यक्तीत्वापासून झाली आहे, परंतु कोणताही धर्म असा नाही, की ज्याने असा प्रेषीत सादर केला असावा, जो सर्व धार्मिक आदेशांच्या आणि तत्वज्ञानांच्या सादर करण्याचा दावा करत असेल. आणि ज्या प्रेषीताला सर्व मानवजातीसाठी एक आदर्श नमूना म्हणून सादर केले गेले असावे. ख्रिस्ती धर्म, जो सर्वात जवळचा धर्म आहे, तो येशू ख्रिस्ताला अल्लाहचा पुत्र ठरवून या गोष्टीची शक्यताच ठेवत नाही, की त्याचे अनुकरण कोणीही मानवप्राणी करू शकेल. कारण मानव हा ईश्वरासमान होऊ शकत नाही. तोराह हज़रत मूसा (अ.स.) यांना आदर्श नमूना म्हणून सादर करत नाही. त्याच प्रमाणे तोराह आणि इंजील हज़रत मूसा आणि ईसा यांना धार्मिक तत्वज्ञानांचे स्पष्टीकरण करण्यासाठी जबाबदार ठरवत नाही. परंतु पवित्र कुरआन पवित्र पैगंबरांच्या बाबतीत असे स्पष्ट करते,

وَ يُعَلِّمُكُمُ الْكِتٰبَ وَالْحِكْمَةَ
(सुरह बकराः १५२)

अर्थात हा प्रेषीत तुम्हाला ईश्वरीय आदेश आणि त्या मागचे तत्वज्ञान स्पष्ट करून सांगतो, म्हणून इस्लाम याबाबतीत देखील वैशिष्टपूर्ण आहे, की त्याचा प्रेषीत संपूर्ण जगासाठी आदर्श अनुकरणीय नमूना आहे आणि आपले आदेश बळजबरीने मान्य करायला न लावता, जेव्हा एखादा आदेश देतो, तेव्हा आपल्या अनुयायींच्या निष्ठेला दृढता प्रदान करण्यासाठी आणि त्यांच्या उत्साहाला बळकटी देण्यासाठी, हे देखील स्पष्ट करतो की, जे आदेश देण्यात आले आहेत त्यात मुस्लिम समाज आणि मुस्लिम समाजातील व्यक्ति, तसेच अन्य मानवजातीसाठी काय काय लाभ अंतरभूत आहेत. त्याच प्रमाणे इस्लाम अन्य धर्मांपासून त्यांच्या शिकवणूकीच्या संदर्भात देखील वैशिष्टपूर्ण आहे. इस्लामची शिकवण लहान आणि थोर, गरीब आणि श्रीमंत, स्त्री आणि पुरूष, पौरवात्य आणि पाश्चिमात्य, दुर्बळ आणि बलवान, शासक आणि प्रजा, धनी आणि मजूर, पती आणि पत्नी, माता पिता आणि संतान, विक्रेता आणि ग्राहक, शेजारी आणि वाटसरू, सर्वांसाठी समाधान, शांती आणि उन्नतीचा संदेश आहे. तो मानवजातीपैकी कोणत्याही गटाला आपल्या संबोधनापासून वंचित ठेवीत नाहीत. तो माजी आणि भावी सर्व राष्ट्रांसाठी एक मार्गदर्शन आहे. ज्याप्रमाणे अज्ञाताचे ज्ञान असणाऱ्या परमेश्वराची नजर पाषाणाखाली दबलेल्या प्रत्येक खणावर पडते आणि आकाशात चमकणाऱ्या प्रत्येक ताऱ्यावर देखील पडते, त्याच प्रमाणे मुसलमानांच्या धर्माची शिकवण गरीबाहून गरीब आणि निर्बलाहून निर्बल माणसांच्या गरजांना देखील पूर्ण करते आणि श्रीमंताहून श्रीमंत आणि प्रबळाहून प्रबळ मानवांच्या गरजांची पूर्ति देखील करते. थोडक्यात असे की, इस्लाम फक्त पूर्वीच्या

धर्मांची एक नक्कल नसून, तो धर्मांच्या साखळीची शेवटची कडी आणि आध्यात्मिक व्यवस्थेचा सूर्य आहे. आणि त्याच्या कुठल्याही बाबतीत अन्य धर्माशी तुलना करणे उचित नाही. धर्म या नावामध्ये जरी सर्वच सामील आहेत त्याच प्रमाणे ज्याप्रकारे हिरा आणि कोळसा कार्बनच्या नावामध्ये सामील आहेत. परंतु हिरा हिराच आहे आणि कोळसा कोळसाच आहे. ज्याप्रमाणे दगड हे नाव मूरमाळ दगडासाठी देखील वापरला जातो आणि संगमरवर या दगडासाठी देखील वापरला जातो. परंतु मूरमाळ दगड दगडच आहे आणि संगमरवर संगमरवरच आहे. म्हणून असे समजणे, की ज्याप्रमाणे इस्लामचा एक वेगळा 'कलमा' आहे म्हणून बाकी सर्व धर्मांचा देखील कलमा असेल असे समजणे, हे केवळ अज्ञान आणि पवित्र कुरआनावर सखोल विमर्श न करण्याचा परिणाम आहे. या पेक्षाही मोठा अत्याचार त्या लोकांनी केला आहे ज्यांनी 'ला इलाहा इल्लल्लाहु इब्राहिम खलीलुल्लाह' - 'ला इलाहा इल्लल्लाहु मूसा कलीमुल्ला' आणि 'ला इलाहा इल्लल्लाहु इसा रूहूल्लाह' असे कलमे सुध्दा सादर केले आहेत. आणि असे म्हटले आहे, की हे पूर्वीच्या धर्माचे कलमे आहेत. वास्तविक पाहता तोराह, इंजील आणि ख्रिस्तींच्या साहित्यात कोठेही या कलमांचा नामनिर्देश आणि उल्लेख आढळत नाही. मुसलमांनामध्ये हजारो बिगाड निर्माण झालेले आहेत, परंतु काय ते आपला कलमा विसरले आहेत? मग हे कसे काय सांगितले जाते, की ख्रिस्ती आणि यहुदी आपला कलमा विसरले आहेत. जर का ते आपला कलमा विसरले आहेत आणि त्यांच्या ग्रंथांतून देखील ते कलमा गायब झाले आहेत तर मग मुसलमानांना हे कलमे कोणी सांगितले? वस्तूस्थिती अशी आहे, की महंमद पैगंबर (स.) यांच्या शिवाय अन्य कोणत्याही प्रेषीताचा कलमा नाही. महंमद रसूलल्लाह यांच्या वैशिष्टयांपैकी हे एक वैशिष्ट आहे की, सर्व प्रेषीतांपैकी फक्त त्यांनाच कलमा

देण्यात आला आहे आणि अन्य कोणत्याही प्रेषीताला कलमा देण्यात आला नाही. त्याचे कारण असे आहे, की कलमा मध्ये प्रेषीतत्वाच्या स्वीकाराला ईश्वराच्या एकत्वाच्या स्वीकारा बरोबर जोडण्यात आले आहे. आणि ईश्वराच्या एकत्वाचा स्वीकार, हे एक शाश्वत सत्य आहे, ते कधीही नष्ट होवू शकत नाही. जसे की, पूर्वीच्या प्रेषीतांचा कार्यकाळ कधी ना कधी संपुष्टात येणार होता. म्हणून परमेश्वराने कोणत्याही प्रेषीताच्या नावाशी आपले नाव जोडून सांगितले नाही, परंतु महंमद (स.) यांचे प्रेषीतत्व, ज्याप्रमाणे अंतिम दिनापर्यंत कायम राहणार होते आणि त्यांचा कार्यकाळ कधीही संपुष्टात येणार नव्हता त्यामुळे परमेश्वराने त्यांचे प्रेषीतत्व आणि आपले नाव यांना एकत्वाच्या धर्मसूत्रासोबत जोडून नमूद केले, जेणे करून जगाला हे कळावे, की ज्या प्रमाणे 'ला इलाहा इल्लल्लाहु' कधीही नष्ट होणार नाही त्याच प्रमाणे 'महंमदुर्रसूलुल्लाह' देखील कधीही नष्ट होणार नाही. आश्चर्य आहे की, यहुदी कधीही म्हणत नाही की प्रेषीत मूसा यांचा कलमा होता, ख्रिस्ती म्हणत नाही की येशू ख्रिस्तांचा एखादा कलमा होता, साबी म्हणत नाहीत की प्रेषीत इब्राहिमचा एखादा कलमा होता; परंतु मुसलमान ज्यांच्या प्रेषीताचे वैशिष्ट 'कलमा' होते आणि ज्यांच्या प्रेषीताला परमेश्वराने कलमा देवून अन्य प्रेषीतावर वैशिष्टयपूर्ण प्रतिष्ठा दिली, ते मोठया दिलदारपणे आपल्या प्रेषीताचे हे वैशिष्ट आणि प्रतिष्ठा अन्य प्रेषीतांमध्ये वाटप करण्यास तयार दिसून येतात. आणि ज्या अर्थी या प्रेषीतांच्या अनुयायांनी कुठल्याही कलमांची घोषणा केलेली नाही, त्यांच्याकडे कलमे तयार करून देत असतात की हा यहुदींचा कलमा होता, हा इब्राहिम यांच्या अनुयायींचा कलमा होता आणि हा ख्रिस्ती लोकांचा कलमा होता. थोडक्यात सांगायचे तर प्रत्येक धर्मासाठी कलमा असणे आवश्यक नाही, जरी आवश्यक असता, तरी

देखील अहमदियतचा कोणताही नवीन कलमा असू शकला नसता. कारण अहमदियत कोणताही नवीन धर्म नाही. अहमदियत फक्त इस्लामचेच एक नाव आहे, अहमदियत फक्त त्याच कलम्यावर श्रध्दा ठेवते जो महंमद पैगंबर (स.) यांनी जगासमोर सादर केला आहे. अर्थात

لَآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللّٰہِ

अहमदीं यांच्या समीप या भौतिक जगाचा निर्माता एक परमेश्वर आहे, जो एकमेवाद्वितीय आहे. ज्याच्या शक्तिची आणि प्रभुत्वाची कोणतीही सीमा नाही. जो विधाता आहे, परम कृपाळू आहे, असीम दयाळू आहे, निवाडयाच्या दिवसाचा स्वामी आहे त्याच्या मध्ये ती सर्व गुणवैशिष्ट्ये आढळून येतात जी पवित्र कुरआनामध्ये नमूद केली आहेत, तो त्या सर्व गोष्टींपासून अलिप्त आहे, ज्या गोष्टींपासून पवित्र कुरअनाने त्यास अलिप्त ठरविले आहे. तसेच अहमदींच्या दृष्टीने 'मुहंमद बिन अब्दुल्लाह बिन अब्दुल मुतल्लीब, कुरैशी, मक्की' (स.) हे अल्लाहचे प्रेषीत होते आणि त्यांच्यावर सर्वात अंतिम शरियत (धर्मशास्त्र) अवतरीत झाले. ते अरब आणि बिगर अरब, गोरे आणि काळे सर्वच राष्ट्रांसाठी आणि सर्वच वंशासाठी प्रकट झाले होते. त्यांच्या प्रेषीततत्वाचा कार्यकाळ त्यांच्या प्रेषीततत्वाच्या घोषणेपासून सुरू होवून, ज्या दिवशी या जगाच्या पाठीवर एकही जीवजंतू जीवंत असेल त्या दिवसापर्यंत कायम राहणार आहे. त्यांची शिकवण प्रत्येक मानवासाठी अनुकरणीय आहे. आणि कोणीही मानव असा नाही ज्याच्या पर्यंत त्यांचा संदेश सप्रमाण पोहचल्यानंतर देखील तो त्यांच्यावर श्रध्दा ठेवत नाही आणि तो परमेश्वरीय प्रकोपापासून मुक्त होवू शकेल. प्रत्येक व्यक्ती, ज्याच्यापर्यंत त्यांचे नाव पोहचले आहे ज्याच्या समक्ष त्यांच्या सत्यतेचे प्रमाण स्पष्ट केले गेले आहे, त्याच्यासाठी त्यांच्यावर श्रध्दा ठेवणे अनिवार्य आहे. आणि त्यांच्यावर श्रध्दा ठेवल्या शिवाय तो मोक्षाचा अधिकारी होवू शकत नाही आणि खरीखुरी पवित्रता त्यांच्या पदचिन्हांचे अनुकरण केल्याशिवाय प्राप्त होवू

शकत नाही.

# अहमदींच्या संदर्भात काहीं शंकांचे निरसन

## खतमे नबुव्वतच्या संदर्भात अहमदींची धारणा

वर उल्लेखीलेल्या अज्ञानी लोकांच्या समूहापैकी काहीं लोक असा विचार करतात, की अहमदी लोक 'खतमे नबुव्वत( प्रेषीततत्वाची मोहोर)' ला मान्यता देत नाहीत आणि हज़रत महंमद (स.) यांना 'खातमुन्नबिय्यीन' (प्रेषीतांपैकी सर्वोत्तम) मानत नाहीत. ही गोष्ट फक्त त्यांचे अज्ञान आणि अपसमजामुळे प्रचलित आहे. ज्या अर्थी अहमदी स्वत:ला मुसलमान म्हणतात आणि कलमा शहादतवर दृढ विश्वास ठेवतात तर मग हे कसे काय शकय आहे, की ते खतमे नबुव्वतला नकारतात आणि पवित्र प्रेषीत महंमद (स.) यांना 'खातमुन्नबिय्यीन' म्हणून स्वीकार करत नाहीत. पवित्र कुरआन मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की ,

مَا كَانَ مُحَمَّدٌ اَبَآ اَحَدٍ مِّنْ رِّجَالِكُمْ وَلٰكِنْ رَّسُوْلَ اللّٰهِ وَخَاتَمَ النَّبِيّٖنَ

(सुरह अहजाब:४१)

अर्थात महंमद (स.) तुमच्यापैकी कोणत्याही तरूण पुरूषाचे पिता नाहीत, परंतु ते अल्लाहचे संदेष्टा आणि प्रेषीतांची मोहोर आहेत. पवित्र कुरआनावर श्रध्दा ठेवणारी व्यक्ती, ही आयत कशी काय नकारू शकते. म्हणून अहमदींची धारणा अजिबात अशी नाही की प्रेषीत महंमद (स) (ईश्वर क्षमा करो) 'खातमुन्नबिय्यीन' नव्हते. जे काही अहमदी म्हणतात ते इतकेच आहे, की 'खातमुन्नबिय्यीन'चा अर्थ, जो या समयी मुसलमानांमध्ये प्रचलित आहे, तो पवित्र कुरआनाच्या वरील आयती वर लागू होत नाही आणि त्यामुळे पवित्र पैगंबर (स.) ची ती प्रतिष्ठा आणि महत्ती त्यातून प्रदर्शित होत नाही जी प्रतिष्ठा आणि महत्ती या आयतीतून प्रदर्शित होणे अभिप्रेत आहे. आणि अहमदिया

मुस्लिम जमाअत, 'खातमुन्नबिय्यीन'चा तो अर्थ स्वीकारते जो अरबी शब्दकोशानुसार सर्व साधारणपणे योग्य आहे आणि ज्या अर्थाचे समर्थन हज़रत आयशा सिद्दीका आणि हज़रत अली (र.जि.) आणि अन्य काहीं सोबतीं करतात. आणि ज्यामुळे प्रेषीत महंमद (स.) यांची महत्ती आणि प्रतिष्ठा वाढते आणि संपूर्ण मानवजातीवर त्यांचे प्रभुत्व सिध्द होते. म्हणून अहमदी 'खतम ए नबुव्वत'ला नकारत नसून त्या अर्थाला नकारतात जो सर्व साधारण मुसलमांनामध्ये आज च्या काळात गैरसमजातून प्रचलित आहे. अन्यथा खतम ए नबुव्वतला नकारणे श्रध्दाहीनता आहे. आणि अहमदी परमेश्वराच्या कृपेने मुसलमान असून ते इस्लामचे अनुकरण करणे मोक्षाचा एकमेव मार्ग समजतात.

## पवित्र कुरआन

याच अज्ञानांपैकी काहीं लोक असाही विचार बाळगतात की, अहमदी संपूर्ण कुरआनावर श्रध्दा ठेवत नाहीत, तर फक्त त्याच्या काहीं खंडावर श्रध्दा ठेवतात. मला अलिकडे क्वेटा मध्ये डजनानी असे लोक भेटले ज्यांनी मला सांगितले, की आम्हाला मौलवींनी असे सांगितले आहे, की अहमदी संपूर्ण कुरआनावर श्रध्दा ठेवत नाहीत. हा सुध्दा एक मोठा आरोप अहमदियतच्या शत्रूंनी अहमदियतवर लावला आहे. अहमदियत पवित्र कुरआनाला एक अपरिवर्तनीय आणि कधीही रद्द न होणारा ग्रंथ मानते. अहमदियत बिस्मिल्लाह च्या 'ब' पासून तर वान्नास च्या 'स' पर्यंत प्रत्येक अक्षर आणि प्रत्येक शब्द हा ईश्वराकडून आहे आणि तो सर्वच्या सर्व अनुकरणीय आहे, अशी श्रध्दा ठेवते.

## अहमदींची देवदूतांबद्दल धारणा

याच नासमज लोकांपैकी काहीं लोक अहमदींवर असा आरोप देखील लावतात की, अहमदी देवदूतांना आणि सैतानाला मान्य करत नाहीत. हा आरोप देखील पूर्णपणे निराधार आहे. देवदूतांचा (फरिश्ते)

उल्लेख पवित्र कुरआनामध्ये आहे, तसेच सैतानाचाही उल्लेख पवित्र कुरआना मध्ये आहे. ज्या गोष्टींचा उल्लेख पवित्र कुरआनामध्ये स्पष्टपणे आलेला आहे त्या गोष्टींना पवित्र कुरआनावर श्रध्दा असणाऱ्यांनी नकारण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. मग अहमदियत या गोष्टींना कसे काय नकारू शकते. आम्ही परमेश्वराच्या कृपेने देवदूतांवर पूर्ण श्रध्दा ठेवतो, किंबहुना अहमदियत मुळे जे कृपाप्रसाद आम्हाला प्राप्त झाले आहेत, त्यांच्यामुळे आम्ही फक्त देवदूतांवर श्रध्दाच ठेवत नाहीत, तर आमचा असा दृढ विश्वास देखील आहे, की पवित्र कुरआनाच्या साहाय्याने देवदूतांशी संपर्क देखील प्रस्थापित केला जावू शकतो आणि त्यांच्या मार्फत आध्यात्मिक ज्ञान देखील प्राप्त केले जावू शकते.

स्वत: प्रस्तूत लेखकाने देवदूतांकडून अनेक विषयांचे ज्ञान प्राप्त केले आहे. मला एकदा एका देवदूताने 'सुरह फातिहा' या अध्यायाचे भाष्य शिकविले आणि तेव्हा पासून आजपर्यंत सुरह फातिहा चे इतके अर्थ माझ्यावर प्रकट झाले आहेत की ज्याची परिसीमा नाही. आणि माझा असा दावा आहे की, कोणत्याही धर्माची व्यक्ति आध्यात्मिक ज्ञानाच्या बाबतीत कोणत्याही विषयाच्या संदर्भात जे काही आपल्या संपूर्ण ग्रंथातून अन्वयार्थ काढू शकतो, त्यापेक्षा अधिक त्या विषयाच्या अनुषंगाने मी फक्त ईश्वर कृपेने सुरह फातिहा मधून अन्वयार्थ काढू शकतो. एका प्रदीर्घ कालावधीपासून संपूर्ण जगाला मी हे आव्हान देत आलो आहे; परंतु आजपर्यंत कोणीही ते आव्हान स्वीकारलेले नाही. परमेश्वराच्या अस्तित्वाचे प्रमाण, परमेश्वराच्या एकत्वाचे प्रमाण, प्रेषीतत्व आणि त्याची आवश्यकता, धर्मशास्त्राच्या (शरियत) परिपूर्णतेची लक्षणे आणि मानवजातीसाठी त्याची आवश्यकता, प्रार्थना(दुआ), दैव, अंतिम निवाडा, स्वर्ग आणि नरक, या सर्वच विषयांवर सुरह फातिहा मध्ये इतका प्रकाश पडतो की अन्य ग्रंथांच्या शेकडो पृष्ठात देखील इतका प्रकाश मानवाला प्राप्त होवू शकत नाही. म्हणून देवदूतांच्या अस्तित्व नकारण्याचा प्रश्नच येत नाही, तर उलट अहमदी तर देवदूतांकडून लाभ

घेण्याचे सुध्दा समर्थक आहेत. प्रश्न राहिला सैतानाचा, तर सैतान हा तर अतिशय अपवित्र गोष्ट आहे, त्यावर श्रध्दा ठेवण्याचा तर प्रश्नच येत नाही. परंतु त्याच्या अस्तित्वाचे ज्ञान आम्हाला पवित्र कुरआनातून प्राप्त होते आणि आम्ही त्याच्या अस्तित्वाचा स्वीकार करतो. आणि फक्त स्वीकारच करत नाही, तर हे सुध्दा मान्य करतो, की परमेश्वराने आमची ही जबाबदारी ठरवली आहे, की आम्ही सैतानाच्या शक्तिचा बिमोड करून त्याची सत्ता नष्ट करावी. सैतानाला देखील मी स्वप्नात पाहिले आहे आणि एकदा तर मी त्याच्याबरोबर कुस्ती देखील केली आहे आणि परमेश्वराच्या सहाय्याने आणि पवित्र कुरआनातील वचनाच्या कृपेने त्याला मात देखील दिली आहे. आणि एकदा परमेश्वराने मला असे सांगितले की, ज्या कार्यासाठी तुझी नियुक्ती केली जाईल त्याच्या मार्गात सैतान आणि त्याची संतती अनेक अडथळे निर्माण करतील, तुम्ही त्या अडथळयांची काहीही दखल न घेता, ''परमेश्वराच्या कृपे आणि दयेने'' हे वाक्य उच्चारत पुढे पुढे मार्गक्रमण करत रहावे. तेव्हा पासून मी त्या दिशेला चालत गेलो, ज्या दिशेकडे जाण्याचे परमेश्वराने मला आदेश दिले होते आणि मी पाहिले, की सैतान आणि त्याची संतती वेगवेगळया पध्दतीने मला धमकावण्याचे आणि भय दाखविण्याचे प्रयत्न करत राहिले. काही ठिकाणी फक्त डोकीच डोकी समोर येत आणि मला भेडसावण्याचे प्रयत्न करत आणि काही ठिकाणी फक्त डोके विरहित धडच माझ्या समोर येत. काही ठिकाणी सैतान, वाघ आणि बिब्टयाच्या रूपात, तर काही ठिकाणी हत्तींचे रूप धारण करून समोर येत असे, परंतु परमेश्वराच्या आज्ञाप्रमाणे मी त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष्य फक्त हेच म्हणत की, '**परमेश्वराच्या कृपे आणि दये सोबत**,' पुढे चालत राहिलो.

जेव्हा जेव्हा मी वरील वाक्य उच्चारत असे तेव्हा सैतान आणि त्याची संतती पळून जात असे. आणि सर्व मैदान साफ होत असे. परंतु

थोडयाच वेळात पुन्हा एक नवीन रूप धारण करून ते माझ्या समीप येत असत, परंतु प्रत्येक वेळी मी या एकाच उपायाने त्याला नष्ट करण्यात यशस्वी होत असे आणि शेवटी आपल्या निर्धारित स्थळापर्यंत पोहचत असे. आणि सैतान पूर्णपणे निष्प्रभ होऊन मैदान सोडून जात असे. याच स्वप्नाच्या आधाराने मी आपल्या प्रत्येक लिखाणाच्या सरनाम्यावर 'परमेश्वराच्या कृपे आणि दये सोबत' हे वाक्य लिहीत असतो. म्हणून आम्ही देवदूतांवर श्रध्दा ठेवतो आणि सैतानाचे अस्तित्व देखील मान्य करतो.

काही लोक असे म्हणतात, की अहमदी लोक साक्षात्कार (चमत्कार) नकारतात, हे सुध्दा वस्तुस्थितीच्या विपरीत आहे. महंमद पैगंबर (स.) यांचे चमत्कार आणि साक्षात्कार तर आहेतच, पण आम्ही या गोष्टीवर देखील विश्वास ठेवतो, की महंमद पैगंबरांचे सच्चे अनुयायींना देखील परमेश्वर साक्षात्कार (चमत्कार) प्रदान करतो. पवित्र कुरआन महंमद पैगंबरांच्या साक्षात्कार आणि चमत्कारांनी व्यापून राहिला आहे. त्याचा नकार फक्त एखादा जन्मजात अंधळाच करू शकतो.

## मोक्षाच्या संदर्भात अहमदींची धारणा

काही लोक अहमदींच्या संदर्भात या गैरसमजात गुरफटलेले आहेत, की अहमदींच्या धारणेनुसार अहमदींना सोडून बाकी सर्व लोक नरकात जाणार आहेत. हा गैरसमज सुध्दा फक्त अज्ञान आणि वैरभावामुळे आहे. आमची अजिबात अशी धारणा नाही, की अहमदींना सोडून बाकी सर्व लोक नरकात जातील. आम्ही असे देखील मानतो, की एखादी व्यक्ति अहमदी असून सुध्दा नरकात जावू शकते, ज्याप्रमाणे एखादी व्यक्ति अहमदी नसून सुध्दा स्वर्गात जावू शकते. कारण फक्त मौखिक स्वीकार केल्याने कोणालाही स्वर्ग प्राप्त होत नाही. स्वर्ग प्राप्तीसाठी अनेक जबाबदाऱ्यांची आणि कर्तव्यांची परिपूर्ति करावी

लागते. त्याचप्रमाणे फक्त मौखिक नकार दिल्याने कोणीही नरकाचा धनी होत नाही त्याच्यासाठी देखील अनेक अटी आहेत. कोणीही व्यक्ति नरकात जाऊ शकत नाही, जोपर्यंत त्याच्यावर सत्य पूर्णपणे आविष्कृत होत नाही. मग तो मोठयातील मोठया सत्याला नकारणारा का असे ना. स्वत: पैगंबर (स.) म्हणतात की, बालपणी मृत्यु पावणारे किंवा डोंगर दऱ्या मध्ये आणि जंगलात राहणारे किंवा इतके वृध्द की ज्यांना समज नाही किंवा वेडपट आणि बुध्दीहीन अशा लोकांकडून परमेश्वर कोणताही हिशोब घेणार नाही. उलट अंतिम निवाडाच्या दिवशी परमेश्वर त्यांच्याकडे परत एकदा प्रेषीत पाठवून त्यांना सत्य आणि असत्य ओळखण्याची संधी देईल आणि जेव्हा त्यांच्यावर सत्य पूर्णपणे प्रकट होईल, तरी ते त्याला नकारतील तर मग ते नरकात जातील. आणि जे सत्याला स्वीकार करतील ते स्वर्गात जातील. म्हणून ही गोष्ट सर्वस्वी चूकीची आहे, की अहमदी असे समजतात, की अशी प्रत्येक व्यक्ति जी अहमदियत मध्ये सामील नाही, ती नरकात जाईल. मोक्षाच्या संदर्भात आमची धारणा अशी आहे की, अशी प्रत्येक व्यक्ति जी सत्याला समजून घेण्याचे टाळत राहते आणि असा प्रयत्न करते की सत्य त्याच्या कानापर्यंत पोहचू नये जेणे करून त्याला सत्य स्वीकारणे भाग पडेल किंवा ज्याच्यावर सत्याचा पूर्ण आविष्कार होवून देखील तो त्यावर श्रध्दा धारण करणार नाही, तो परमशेवराच्या दृष्टीने शिक्षेस पात्र ठरेल. परंतु अशा व्यक्तिला देखील परमेश्वराची इच्छा असेल, तर त्याला क्षमा करू शकतो आणि त्याच्या कृपेचे वाटप आमच्या हातात नाही. एक दास आपल्या स्वामीला दान करण्यापासून रोखू शकत नाही. परमेश्वर आमचा स्वामी आहे आणि आमचा सत्ताधीश आहे आणि आमचा निर्माता आहे आणि आमचा धनी आहे. जर त्याच्या तर्कानुसार आणि ज्ञानानुसार आणि त्याच्या कृपेनुसार तो कोणत्याही व्यक्तिला क्षमा करू इच्छित असेल, ज्याचे दर्शनी परिस्थितीनुसार त्याला क्षमा प्राप्त होणे अशक्य वाटते, तर आम्ही त्याला अवरोध करणारे कोण

आहोत आणि आम्ही त्याला क्षमादान करण्यापासून कसे काय रोखू शकतो?

मोक्षाच्या संदर्भात तर अहमदींची धारणा इतकी विशाल आहे की, त्याच्यामुळे देखील काहीं मौलवींनी अहमदींवर श्रध्दाहीनतेचा फतवा दिलेला आहे. अर्थात आम्ही लोक अशी धारणा ठेवतो की, कोणीही मानव कायमस्वरूपी प्रकोपात गुरफटला जाऊ शकत नाही, मग तो श्रध्दावान असो, की श्रध्दाहीन असो. कारण पवित्र कुरआनामध्ये परमेश्वर म्हणतो की,

وَرَحْمَتِيْ وَسِعَتْ كُلَّ شَيْءٍ

(अल आराफ:१५७)

अर्थात आणि माझ्या कृपाप्रसादाने प्रत्येक गोष्टीला व्यापून टाकले आहे. आणि पुढे म्हटले आहे की,

فَاُمُّهٗ هَاوِيَةٌ

(अल् क़ारिअह:१०)

अर्थात श्रध्दाहीन आणि नरक यांचा परस्परसंबंध असा असेल जसे एक स्त्री आणि त्याच्या बाळाचा असतो. आणि पुढे म्हटले आहे की की,

وَمَا خَلَقْتُ الْجِنَّ وَالْاِنْسَ اِلَّا لِيَعْبُدُوْنِ

(अज् ज़ारियात: ५७)

अर्थात प्रत्येक जिन्न आणि मानव यांना मी आपला उपासक बनवण्यासाठी निर्माण केले आहे. या आणि अशा अनेक आयती असताना आम्ही असे कसे म्हणू शकतो, की परमेश्वराची कृपा नरक वासीयांना कशी काय व्यापणार नाही. आणि नरकवासी नरकाच्या गर्भातून कधीही बाहेर येणार नाहीत आणि तो दास ज्याला परमेश्वराने आपला उपासक बनवण्यासाठी जन्म दिला आहे, तो कायमस्वरूपी सैतानाचा उपासक बनून राहिला आणि परमेश्वराचा उपासक होणार

नाही. आणि परमेश्वराचा प्रेमळ आवाज, की

فَادۡخُلِیۡ فِیۡ عِبٰدِیۡ وَادۡخُلِیۡ جَنَّتِیۡ

(अल फजर: ३०-३१)

अर्थात या माझ्या उपासकात सामील व्हा आणि माझ्या स्वर्गात दाखल व्हा, त्याला संबोधित करणार नाही.

## अहमदींची अहादीस (पैगंबर वचनां)वर श्रध्दा

काहीं लोक असा संशय बाळगतात, की अहमदी लोक हदीस अर्थात पैगंबरांच्या वचनांना मानत नाहीत आणि काही लोक असा आरोप लावतात, की अहमदी लोक धर्मशास्त्र पंडितांना मान्यता देत नाहीत. या दोन्ही गोष्टी चूकीच्या आहेत. अहमदियत, अनुकरण (तकलीद) आणि अनानुकरण (गैरतकलीद) या बाबतीत मधल्या मार्गाचा अवलंब करतात. अहमदियतची अशी शिकवण आहे, की जी गोष्ट महंमद पैगंबर यांच्याकडून सिध्द झालेली आहे, त्यानंतर अन्य कोणत्याही व्यक्तिचा आदेश मानने पवित्र पैगंबराचा अवमान आहे. स्वामी असताना कोणत्याही गुलामाची आज्ञा ऐकली जावू शकणार नाही. गुरूच्या समोर कोणत्याही शिष्याकडून पाठ घेतला जावू शकत नाही. धर्मशास्त्राचे पंडित मग ते कितीही महान असोत, शेवटी ते महंमद पैगंबरांचे शिष्य आहेत आणि महंमद पैगंबरांचे ते गुलाम आहेत. त्यांची सर्व प्रतिष्ठा महंमद पैगंबरांचे अनुकरण करण्यात होती आणि त्यांची संपूर्ण महानता महंमद (स.) यांच्या आश्रयात होती. म्हणून जी गोष्ट पवित्र प्रेषित यांच्या द्वारे सिध्द झालेली असेल आणि त्याचे लक्षण हे आहे, की जी गोष्ट पवित्र पैगंबर यांच्याशी संबंधीत म्हटली जाते, ती पवित्र कुरआनाच्या अनुसार असेल, तर ती गोष्ट अंतिम निर्णय ठरते आणि ती अटल आज्ञा आहे आणि कोणत्याही व्यक्तिला या गोष्टीचा अधिकार नाही, की तो त्या आज्ञेला रद्दबातल ठरवू शकेल किंवा त्या विरूध्द आपले तोंड उघडू शकेल. परंतु ज्या अर्थी पैगंबर वचनांचे कथनकार

मानवप्राणी असून त्यांच्यात काहीं सदाचारी आणि दुराचारी देखील असू शकतात. त्यांच्यापैकी काहीं चांगली स्मरणशक्तिधारक आणि काहीं कमी स्मरणशक्तिधारक असू शकतात. तसेच काहीं चांगली बुध्दीमत्ता असलेले असू शकतात, तर काहीं मंदबुध्दी असू शकतात. जर का असे पैगंबर वचन असेल, ज्याचा अन्वयार्थ पवित्र कुरआनाच्या विरूध्द जात असेल, तर प्रत्येक हदीस खात्रीलायक असू शकत नाही उलट हदीसच्या संशोधकाच्या दृष्टीने देखील काहीं पैगंबर वचने खात्रीलायक आहेत आणि काहीं सर्वसामान्य आहेत, काहीं संशयास्पद आहेत आणि काहीं काल्पनिक आहेत. काहीं प्रक्षिप्त आहेत म्हणून पवित्र कुरआनासारख्या खात्रीशीर ग्रंथाच्या विरूध्द जी हदीस येईल तिला स्वीकारले जाणार नाही. परंतु ज्या ठिकाणी पवित्र कुरआनात स्पष्ट निर्देष नाहीत आणि पैगंबर वचन देखील अशा मार्गाने सिध्द होत नाहीत, जो विश्वसनीय आणि खात्रीशीर आहे किंवा अशी हदीस ज्याच्यातून अनेक अर्थ निघू शकतात, अशा वेळी जे धर्मशास्त्र पंडित आहेत ज्यांनी आपली संपूर्ण हयात पवित्र कुरआन आणि पैगंबर वचनाचा अभ्यास आणि व्यासंग करण्यात व्यतीत केली आहे, ते त्या पैगंबर वचनाचे अन्वयार्थ लावण्याचे अधिकारी आहेत आणि एक साधारण माणूस, ज्याने कधी पवित्र कुरआनावर मनन केलेले नाही, तसेच पैगंबर वचनांचा सखोल अभ्यास केलं नाही किंवा ज्याचे ज्ञान आणि अन्वयशक्ति या लायकच नाही, की तो मनन करू शकेल, त्याला अधिकार प्राप्त होत नाही, की तो असे म्हणू शकेल, की इमाम अबु हनीफा किंवा इमाम अहमद किंवा इमाम शफअी, किंवा इमाम मालीक किंवा अन्य धर्मपंडित (सर्वांवर अल्लाहची कृपा असो) यांना काय अधिकार आहे, की माझ्यापेक्षा त्यांच्या मताला अधिक किम्मत दिली जावी. मी देखील मुसलमान आहे आणि ते देखील मुसलमान आहेत. जर एक सामान्य माणूस आणि एक डॉक्टर यांच्यात व्याधीच्या संदर्भात मतभेद निर्माण झाले, तर एका डॉक्टरच्या मताला सामान्य माणसाच्या मतापेक्षा अधिक महत्त्व

दिले जाईल आणि जर कायद्याच्या संदर्भात मतभेद झाले, तर एका वकीलाच्या मताला सामान्य माणसाच्या मतावर प्राधान्य दिले जाईल. मग धार्मिक बाबतीत असे काय कारण आहे, की जे धर्मपंडित आहेत, ज्यांनी आपली संपूर्ण हयात पवित्र कुरआन आणि पैगंबर वचनावर चिंतन मनन करण्यात घालवली आहे आणि ज्यांची बुध्दीमत्ता देखील अन्य लाखो लोकांपेक्षा सरस आहे आणि ज्यांची ईशपरायणता आणि ज्यांची शूचिर्भूतता निर्विवाद आहे, त्यांच्या मताला प्राधान्य दिले जावू नये. थोडक्यात अहमदी पूर्णपणे अहले हदीस (हदीसला प्राधान्य देणारे) यांच्या मताचेही समर्थन करत नाहीत आणि पूर्णपणे अनुकरण प्रिय लोकांचे मताचेही समर्थन करत नाहीत. अहमदियतची सरळ सरळ अशी धारणा आहे, की या बाबतीत जी धारणा हज़रत इमाम अबु हनिफा यांची होती, ती अशी की, पवित्र कुरआन सर्वांवर प्रभावी आहे, त्याखाली खात्री लायक पैगंबर वचनांचा दर्जा आहे आणि त्याच्या खाली धर्मशास्त्रींच्या मतांचा आणि अन्वयार्थांचा दर्जा आहे. याच धारणेनुसार अहमदी स्वत:ला कधी हनफी सुध्दा म्हणतात ज्याचा अर्थ असा होतो, की इमाम अबु हनीफा यांनी धर्माच्या बाबतीत जे स्पष्टीकरण दिले आहे, त्याला आम्ही योग्य मानतो आणि अहमदी स्वत:ला अहले हदीस देखील म्हणून घेतात कारण अहमदियतच्या दृष्टीने महंमद (स.) यांचे वचन जर ते पूर्णपणे सिध्द आणि स्पष्ट असेल, तर मग ते सर्वमानव मात्रांच्या वचनावर प्रभावी राहील. मग ते सर्व धर्मशास्त्र पंडितांच्या एकत्रित वचनावर देखील प्रभावी ठरेल.

## दैवाच्या संदर्भात अहमदींची धारणा

अनेक गैरसमजांपैकी अज्ञानी लोकांचे, अहमदिया मुस्लिम जमाअत बद्दल, हे देखील गैरसमज आहे, की अहमदी लोक दैव (तकदीर) मानत नाहीत. अहमदी लोक दैवाला अजिबात नकारत नाहीत. आम्ही लोक, ही गोष्ट मान्य करतो की परमेष्वराचे दैवी शक्ति

या जगामध्ये कार्यरत आहे आणि अंतिम निवाडाच्या दिवसापर्यंत ती जारी राहील आणि या दैवाचा काहीही बदल असू शकत नाही. आम्ही फक्त या गोष्टीच्या विरूध्द आहोत, की चोराची चोरी, बेनमाजीचे नमाज न पढणे, लबाडाची लबाडी, दगलबाजाची दगलबाजी, खुन्याचे खून करणे आणि दुराचाऱ्याचा दुराचार या गोष्टींचा परमेश्वराशी संबंध जोडला जावा. आणि आपल्या तोंडावरील काळीमा परमेश्वराच्या तोंडावर लावण्याचा प्रयत्न केला जावा. आमच्या दृष्टीने परमेश्वराने या जगामध्ये दैव आणि कर्म हे दोन कालवे एकाच वेळी चालवलेले आहेत. आणि

بَيْنَهُمَا بَرْزَخٌ لَّا يَبْغِيٰنِ

(अर रहमानः २१)

च्या वचना प्रमाणे, या दोन्ही मध्ये एक हद्द निश्चित केलेली आहे. ज्यामुळे हे कधीही आपसात भिडत नाहीत. कर्माचे मैदान वेगळे आहे आणि दैवाचे मैदान वेगळे आहे. ज्या गोष्टी बाबत परमेश्वराने दैवाला निश्चित ठरवले आहे, त्या बाबतीत कर्म काहीही करू शकत नाही. आणि ज्या गोष्टींच्या बाबतीत कर्माचा मार्ग खुला ठेवला आहे, त्या बाबतीत दैवावर भिस्त ठेऊन बसून राहणे, आपल्या भविष्याला स्वतः नष्ट करण्यासमान आहे. म्हणून आम्ही ज्या गोष्टीच्या विरूध्द आहोत, ती ही आहे की मानवाने आपल्या दुष्कर्मांना दैवाच्या आड लपविण्याचा प्रयत्न करून आपल्या निष्क्रियतेसाठी आणि आळसासाठी दैवाला जबाबदार ठरवावे आणि ज्या ठिकाणी परमेश्वराने कर्म (तदबीर) करण्याचा आदेश दिला आहे त्या ठिकाणी दैवावर आशा लावून बसून राहणे; कारण याचा परिणाम नेहमीच भयंकर होवू शकतो. मुसलमानांनी दैवगतिवर विसंबून राहून प्रयत्नांची पराकाष्ठा करणे सोडून दिली, जी त्यांच्या राष्ट्रीय उन्नतीसाठी आवश्यक होती. याचा परिणाम असा झाला, की ते धर्मापासूनही वंचित झाले आणि भौतिक प्रगती पासूनही वंचित राहिले. जर त्यांनी या गोष्टीकडे ध्यान दिले असते, ज्या बाबतीत

परमेश्वराने कर्माचा मार्ग उघडला आहे, त्या मध्ये दैवावर भिस्त ठेवण्या ऐवजी कर्म केले असते, तर त्यांची दशा इतकी वाईट झाली नसती आणि ते इतक्या दुर्दशेला पोहचले नसते, जेथे ते आता पोहचले आहेत.

## जिहादच्या संदर्भात अहमदींची धारणा

अहमदियतच्या संदर्भात जे गैरसमज आहेत, त्यात हा देखील गैरसमज आहे, की अहमदी जिहादला नकारतात; हे बरोबर नाही. अहमदी जिहादला नकारत नाहीत. अहमदींची धारणा फक्त ही आहे, की युध्द दोन प्रकारचे असतात, एक जिहाद आणि दुसरे केवळ युध्द. जिहाद फक्त त्या युध्दाला म्हटले जाते, की ज्यामध्ये धर्माचे रक्षण करण्यासाठी लढाई केली जाते आणि अशा शत्रूंशी सामना केला जातो जे तलवारीच्या बळावर धर्माचा नायनाट करू इच्छितो आणि जे खंजिराच्या टोकावर धारणा बदलू इच्छितात. जर जगामध्ये अशा घटना प्रत्यक्षात होऊ लागल्या, तर जिहाद प्रत्येक मुसलमानासाठी अनिवार्य ठरतो. पण अशा जिहादासाठी अशी देखील अट आहे, की अशा जिहादची घोषणा इमामकडून व्हायला पाहिजे, जेणे करून मुसलमानांना समजून यावे, की त्यांच्यापैकी कोणा कोणाला जिहाद मध्ये सहभागी व्हावे लागेल आणि कोणा कोणाला आपल्या पाळीची प्रतिक्षा करावी लागेल. जर असे झाले नाही, तर असा जिहादचा प्रसंग उद्‌भवल्यानंतर जो मुसलमान जिहाद मध्ये सामील होणार नाही, तो अपराधी ठरेल; परंतु जर इमाम असेल तर तोच मुसलमान अपराधी ठरेल ज्याला जिहादसाठी पाचारण करण्यात आले आहे आणि तो सामील झाला नाही. ज्यावेळी अहमदिया मुस्लिम जमाअत कोणत्याही देशात जिहादचा नकार करत होती, ते अशासाठी होते, की तलवारीच्या बळावर धर्मांतर करण्याचा प्रयत्न इंग्रज सरकार करत नव्हते. जर अहमदिया मुस्लिम जमाअतचा हा विचार चूकीचा होता आणि वास्तवात इंग्रज सरकार तलवारीच्या बळावर धर्मांतर करण्याचा प्रयत्न करत होते, तर मग निश्चितच जिहाद करणे अनिवार्य

होते. पण प्रश्न असा निर्माण होतो, की जिहाद अनिवार्य ठरल्यानंतर काय प्रत्येक मुसलमानाने तलवार उचलून इंग्रजांचा सामना केला होता का? जर नाही केला, तर अहमदी तर परमेश्वराला उत्तर देतील, की आमच्या धारणे प्रमाणे जिहादची वेळ अजून आली नव्हती आणि जर आम्ही चूक केली, तर ती आमची चूक अन्वयार्थाची (इजतेहादी) होती. परंतु आमचे विरोधी मौलवी याचे काय उत्तर देतील. काय ते असे म्हणू शकतील, की हे परमेश्वरा! जिहादची वेळ तर आली होती आणि आमची खात्री होती, की जिहादची वेळ आहे आणि आम्ही समजत होतो की जिहाद करणे अनिवार्य आहे; परंतु हे परमेश्वरा आम्ही जिहाद केला नाही कारण आमच्या मनात भीती होती आणि आम्ही अशा लोकांना देखील जिहादसाठी पुढे धाडले नाही ज्यांच्या मनात असे भय नव्हते कारण आम्हाला या गोष्टीची ही भीती होती, की असे केल्याने इंग्रज सरकार आम्हाला पकडेल. आता हा निर्णय मी न्यायप्रिय लोकांच्यावर सोडतो, की त्यांच्या दृष्टीने या दोन उत्तरापैकी कोणते उत्तर परमेश्वराच्या सान्निध्य जास्त स्वीकार्य राहील.

आतापर्यंत मी जे काही म्हटले आहे ते त्यालोकांच्या मनातील किल्मिश दूर करण्यासाठी म्हटले आहे, ज्यांनी अहमदिया मुस्लिम जमाअतचा वरवरचा अभ्यास देखील केला नाही आणि जे अहमदियतचा संदेश त्याच्या शत्रूकडून ऐकतात किंवा अहमदियतचा अभ्यास केल्याविनाच अहमदियतच्या धारणा आणि अहमदियतची शिकवण बनवून टाकतात. आता मी त्या लोकांना संबोधित करू इच्छितो ज्यांनी काही प्रमाणात अहमदियतचा अभ्यास केला आहे आणि जे जाणतात, की अहमदी परमेश्वराच्या एकत्वावर निष्ठा ठेवतात. महंमद पैगंबर (स.) यांच्या प्रेषीतत्वावर देखील निष्ठा ठेवतात. पवित्र कुरआनला देखील मानतात. पैगंबर वचनांना देखील मानतात. नमाज अदा करतात, रोजे धरतात, हज्ज देखील करतात, धर्मदान (ज़कात) देखील देतात, पुनरूत्थानाच्या दिवसावर आणि पाप पुण्याच्या फळावर

देखील श्रध्दा ठेवतात. परंतु ते अंचबित आहेत, की जर अहमदी इतर मुसलमानांप्रमाणेच मुसलमान आहेत, तर मग या नवीन पंथाची स्थापना करण्याची काय गरज होती. त्यांच्या दृष्टीने अहमदींची धारणा आणि त्यांची कृती आक्षेपार्ह नाही; परंतु त्यांच्या दृष्टीने एक नवीन जमाअतीचे गठन करणे आक्षेपार्ह गोष्ट आहे. कारण जर काहींच फरक नाही, तर मग तफावत निर्माण करण्याची काय गरज होती. आणि जर मतभेद नाहीत तर वेगळी मशिद बनविण्याचा उद्देश काय होता.

## नवीन जमाअत निर्माण करण्याचे कारण

या प्रश्नाचे उत्तर दोन प्रकारे दिले जावू शकते. बौध्दिक पध्दतिने आणि आध्यात्मिक पध्दतिने. बौध्दिक पध्दतिने या प्रश्नाचे उत्तर असे आहे, की जमाअत फक्त संख्येचे नाव नाही. हजार, लाख किंवा कोटी लोक म्हणजे जमाअत नव्हे, अपितु जमाअत त्या लोकांच्या संघटनेला म्हणतात, ज्यांनी संघटित होऊन काम करण्याचा निर्णय घेतलेला आहे आणि एक सामूहिक कार्यक्रम ठरवून कार्य करत आहेत. अशा लोकांची संख्या पाच किंवा सात असेल, तरी ती जमाअत आहे आणि ज्यांच्या मध्ये ही गोष्ट नाही, ते कोटयावधी असल्या तरी जमाअत ठरत नाहीत. ज्यादिवशी मक्का शहरा मध्ये महंमद पैगंबर (स.) यांनी प्रेषीतत्वाची घोषणा केली, तर पहिल्या दिवशी फक्त चार लोकांनी त्यांच्यावर श्रध्दा ठेवली आणि ते स्वत: पाचवे होते. परंतु पाच असून सुध्दा ते जमाअत होते. परंतु मक्केतील आठ दहा हजाराची लोकसंख्या जमाअत नव्हती किंवा पूर्ण अरबस्तानातील लोकसंख्या जमाअत नव्हती. कारण त्यांनी संघटितपणे काम करण्याचा निर्णय घेतला नव्हता आणि त्यांचा कुठलाही असा सामुदायिक कार्यक्रम ही नव्हता. म्हणून असा प्रश्न उपस्थित करण्यापूर्वी हे लक्षात घेतले पाहिजे, की काय या वेळीचे मुसलमान एक जमाअत आहेत काय? जगभरातील मुसलमानांनी प्रत्येक बाबतीत एकत्रित येवून कार्य करण्याचा निर्णय घेतला आहे किंवा त्यांचा

एखादा सामुदायिक कार्यक्रम ठरला आहे?. जो पर्यंत प्रश्न सहानुभूतीचा आहे, तो पर्यंत मी ही गोष्ट मान्य करतो, की मुसलमानांच्या मनामध्ये एकमेकांसाठी सहानुभूती आहे; परंतु ती देखील सर्वच मुसलमानांच्या मनामध्ये नाही, काहींच्या मनामध्ये आहे आणि काहींच्या मनामध्ये नाही. आणि परत कुठलीही अशी व्यवस्था अस्तित्वात नाही ज्याच्या माध्यमातून या मतभेदांना दूर करता येईल. मतभेद तर जमाअत मध्ये सुध्दा होतात किंबहुना प्रेषीतांच्या वेळी देखील जमाअत मध्ये मतभेद होते. महंमद (स.) यांच्या काळात देखील काहीं वेळा 'अन्सार आणि मुहाजिरीन' मध्ये मतभेद झाले आणि काहीं वेळा अन्य दुसऱ्या टोळयां मध्ये मतभेद झाले. परंतु ज्यावेळी प्रेषीत महंमद (स.) यांनी निर्णय दिला त्यावेळी सर्व मतभेद संपुष्टात आले. याच प्रमाणे खीलाफतच्या काळात देखील मतभेद निर्माण होत होते. परंतु ज्यावेळी असे मतभेद निर्माण होत, त्यावेळी खलीफा निर्णय देत आणि ते सर्व निर्णय संपुष्टात येत. खीलाफत संपल्यानंतर देखील जवळपास सत्तर वर्षापर्यंत मुसलामान एका सत्तेच्या अधीन राहिले ज्या ज्याठिकाणी मुसलमान होते, त्या त्याठिकाणी ते व्यवस्थेच्या अधीन असत ती व्यवस्था वाईट होती की चांगली होती, परंतु त्या व्यवस्थेने मुसलमानांना एका नात्यात बांधून ठेवले होते. त्या नंतर मतभेद झाले आणि मुसलमान दोन गटात विभागले गेले. स्पेनचा एक गट तयार झाला आणि उर्वरित जगाचा एक गट तयार झाला. हा मतभेद तर होता परंतु फारच सीमित स्वरूपाचा मतभेद होता. जगभरातील मुसलमानांचा बहूतेक भाग एका व्यवस्थेच्या अधीन कार्यरत होता. परंतु तीनशे वर्षानंतर ही व्यवस्था अशी मोडकडीला आली, की सर्वच्या सर्व मुसलमान मतभेदाने ग्रस्त झाले. त्यांच्यात फूट आणि अराजकता पसरली. पैगंबर महंमद (स.) यांनी सत्यवचन

फरमाविले होते की,

خَيْرُ الْقُرُوْنِ قَرْنِيْ ثُمَّ الَّذِيْنَ يَلُوْنَهُمْ ثُمَّ الَّذِيْنَ يَلُوْنَهُمْ ثُمَّ يَفْشُوْا الْكَذِبُ۔

(मुस्लिम किताबुल फजाईल मिन फजले सहाबा)

अर्थात सर्वात उत्तम माझे शतक आहे, त्या खाली ते लोक असतील जे दुसऱ्या शतकातील असतील आणि त्यांच्या खाली तिसऱ्या शतकातील लोक असतील. नंतर जगात सत्याचा नाश होईल आणि अत्याचार आणि उपद्रव आणि मतभेदांचा सर्वत्र सुळसुळाट होऊन जाईल. आणि आपण पाहतो, की असेच होत गेले. मतभेदांची दरी वाढतच गेली आणि आता मागच्या तीन शतकात तर मुसलमानांनी आपले सर्व सामर्थ्य गमावलेले आहे. कधी तर असा काळ होता, की युरोप खंड एक एका मुस्लिम बादशाहला घाबरत होता आणि आता युरोप आणि अमेरिकेच्या वेगवेगळया शक्तिंचा सामना करण्याचे सामर्थ्य संपूर्ण इस्लाम जगतात नाही. यहुदींची किती लहानशी राजवट पॅलीस्टीन मध्ये निर्माण झाली आहे. सिरीया, इराक, लेबनान, साउदीअरेबिया, इजिप्त आणि पॅलेस्टीनची सैन्यदले त्यांचा सामना करत आहेत, परंतु वास्तविकता ही आहे की यु.एन.ओ. ने जो प्रदेश यहुदींना दिला होता त्यापेक्षा किती तरी मोठा प्रदेश आज यहुदींच्या ताब्यात आहे. हे खरे आहे, की यहुदी सत्तेची मदत अमेरिका आणि इंग्लंड करत आहेत, परंतु प्रश्न परत हाच, की कधी काळी मुसलमानांची एक एक सत्ता संपूर्ण पाश्मित्य देशावर प्रभावी होती आणि आता पाश्चिमात्य देशांपैकी काहीं देश संपूर्ण मुसलमानांपेक्षा जास्त शक्तिशाली बनले आहेत. म्हणून जमाअतचा जो अर्थ आहे त्याच्या अनुषंगाने या वेळी मुसलमानांची कुठलीही जमाअत नाही. शासन आहे, ज्या मध्ये सर्वात मोठी पाकिस्तानची सत्ता आहे, जी परमेश्वराच्या कृपेने नुक्तीच स्थापित झाली आहे, परंतु इस्लाम पाकिस्तानचे नाव नाही, इस्लाम इजिप्तचे नाव नाही, इस्लाम

सिरीयाचे नाव नाही, ईरान, अफगानिस्तान आणि साउदी अरेबियाचेही नाव नाही, इस्लाम तर त्या एकवटलेल्या नात्याचे नाव आहे, ज्याने संपूर्ण मुसलमांनांना संघटित केले होते. अशी कुठलीही व्यवस्था आज जगात नाही. पाकिस्तानला अफगानिस्तान बदल सहानुभूती आहे आणि अफगानिस्ताला पाकिस्तानाबद्दल सहानुभूती आहे, परंतु पाकिस्तान अफगानिस्तानचे प्रत्येक गोष्ट मान्य करायला तयार नाही आणि पाकिस्तान व अफगानिस्तान दोघांचे राजकारण वेगवेगळे आहे आणि दोघे आपल्या अंतर्गतबाबी मध्ये स्वतंत्र आहेत. हीच दशा व्यक्तिंची देखील आहे. अफगानिस्तानचे नागरिक आपल्या जागी स्वतंत्र आहेत, तर पाकिस्तानचे नागरिक आपल्या जागी स्वतंत्र आहेत इजिप्तचे नागरिक आपल्या जागी स्वतंत्र आहेत, या सर्वांना एका माळे मध्ये गुंफणारी कोणतीच गोष्ट नाही. म्हणून आज मुसलमान देखील आहेत, मुसलमानांच्या शासन देखील आहेत आणि त्यांच्यापैकी काहीं शासन परमेश्वराच्या कृपेने बलवान देखील होत आहेत. परंतु तरी देखील मुसलमान एक जमाअत नाहीत. ग्रहीत धरा की पाकिस्तानचे नाविक दल इतके बळकट झाले, की ते संपूर्ण हिंद महासागरावर सत्ता गाजवू लागले. त्याचे सेनादल इतके बळकट झाले, की संघराज्य भारत त्याला पाहून चळचळा कापू लागेल. त्याची आर्थिक परिस्थिती इतकी मजबूत झाली, की जगाच्या बाजारपेठेवर त्याचा ताबा कायम झाला. किंबहुना त्याचे सामर्थ्य इतके वाढले, की अमेरिकेच्या सामर्थ्यापेक्षा ते महान झाले. तर काय ईरान, सिरीया, पॅलीस्टीन आणि इजिप्त हे सर्व देश स्वत:ला पाकिस्तान मध्ये विलीन करायला तयार होतील का? स्पष्ट आहे, होणार नाहीत. ते पाकिस्तानच्या सामर्थ्याला मान्यता द्यायला तयार होतील. ते त्याच्या प्रती सहानुभूती दर्शवायला तयार होतील. परंतु ते स्वत:चे अस्तित्व संपुष्टात आणायला तयार नसतील. म्हणून जरी परमेश्वराच्या कृपेने मुसलमानांची राजकीय परिस्थिती मध्ये सुधारणा होत आहे आणि काही नवीन इस्लामी शासन स्थापित होत आहेत परंतु असे असताना

देखील जगभरातील मुसलमानांना एक इस्लामी जमाअत म्हटले जाऊ शकत नाही. कारण ते वेगवेगळया राजकारणात विभागले गेले आहेत आणि वेगवेगळया शासन मध्ये विखुरलेले आहेत. या सर्वांचे आवाज एकत्रित करणारी कोणतीही शक्ति नाही. परंतु इस्लाम तर विश्वव्यापी असण्याची घोषणा करतो. इस्लाम अरबच्या मुसलमानांचे नाव नाही तसेच सिरीयाच्या मुसलमानांचे नाव नाही, ईरानच्या मुसलमानांचे देखील नाव नाही, अफगानिस्तानच्या मुसलमांनाचे नाव नाही. ज्या वेळी प्रत्येक देशातील मुसलमान इस्लामच्या नावाखाली एकत्रित होतील, त्यावेळी तीच इस्लामी जमाअत होऊ शकते, जी या साऱ्या गटांना एकत्रित करणारी असेल आणि जो पर्यंत अशी जमाअत जगामध्ये निर्माण होत नाही, तो पर्यंत आम्ही असे म्हणण्यास विवश आहोत की मुसलमानांची कोणतीही जमाअत नाही, जरी राज्य सत्ता आणि राजकारण आहे.

याच पध्दतिने सामुदायिक कार्यक्रमाचा देखील प्रश्न उपस्थित होतो. ज्या ठिकाणी अशी कुठलीही व्यवस्था नाही, जी संपूर्ण मुसलमानांना एकत्रित करू शकेल, त्याठिकाणी मुसलमानांचा कुठलाही सामुदायिक कार्यक्रम सुध्दा नाही. राजकीय ही नाही, सामाजिकही नाही, धार्मिक देखील नाही. एकट्या दुकटया मुसलमानांचे काही ठिकाणी इस्लामच्या शत्रूशी सामना करणे वेगळी गोष्ट आहे आणि संघटितपणे एका विशिष्ट अशा व्यवस्थेतेच्या अधीन राहून चोहोबाजूनीं शत्रूच्या हल्लयाचा आढावा घेऊन त्याच्याशी सामना करण्याचा प्रयत्न करणे, ही एक वेगळी गोष्ट आहे. म्हणून कार्यक्रमाच्या दृष्टीने देखील मुसलमान एक जमाअत नाहीत अशा परिस्थिती मध्ये जर कुठलीही जमाअत स्थापन होते आणि वर उल्लेखलेल्या दोन्ही उद्दिष्ट्यांना घेऊन स्थापन होते, तर त्या जमाअतवर आक्षेप घेतला जाऊ शकत नाही, की ती एक नवीन जमाअत स्थापन झाली आहे किंबहुना असे म्हटले जायला पाहिजे, की आधी कुठलीच

जमाअत झाली नव्हती परंतु आताएक जमाअत स्थापन झाली आहे.

मी त्या मित्रांना ज्यांच्या मनामध्ये काहीं शंका निर्माण होतात, की एक नमाज, एक किबला, एक कुरआन, एक प्रेषीत असताना, अहमदिया मुस्लिमांनी वेगळी जमाअत का निर्माण केली, म्हणू इच्छितो, की त्यांनी या मुद्दावर विचार करावा आणि लक्षात असू द्यावे, की इस्लामला परत एक जमाअत बनविण्याची वेळ आली आहे. या कार्यासाठी कोठंपर्यंत प्रतिक्षा केली जावी. इजिप्तची सरकार आपल्या ठिकाणी कार्यरत आहे, ईरानची सरकार आपल्या ठिकाणी काम करत आहे. अन्य इस्लामी सरकारेही आपल्या जागी आपले आपले काम करत आहेत. परंतु यांच्या उपस्थितीत देखील एक पोकळी शिल्लक आहे, एक कमतरता शिल्लक आहे आणि याच पोकळी व कमतरतेला पूर्ण करण्यासाठी अहमदिया मुस्लिम जमाअत स्थापन केली गेली आहे. ज्या वेळी तुर्कीस्तानच्या खीलाफतीला तुर्कांनीच नष्ट केले, त्यावेळी इजिप्तच्या काहीं मौलवींनी (काही सुत्रांच्या माहितीनुसार इजिप्तच्या बादशाहच्या सुचनेवरून) खीलाफतीसाठी एक चळवळ सुरू केली आणि या चळवळीच्या माध्यमातून त्यांचा असा मानस होता, की इजिप्त च्या बादशहाला मुसलमानांचा खलीफा म्हणून मान्यता दिली जावी. आणि अशा पध्दतिने इजिप्तला दुसऱ्या इस्लामी देशावर प्रभुत्व प्राप्त व्हावे. साउदी अरबने याला विरोध केला आणि असा प्रचार सुरू केला, की ही चळवळ इंग्रजांनी सुरू केली आहे. जर कुठलीही व्यक्ति खलीफा होण्याची अधिकारी असेल तर तो सउदी अरबचा बादशाह आहे. जिथपर्यंत खीलाफतचा संबंध आहे, तर निश्चितच ते एक असे नाते आहे ज्यामुळे सर्व मुसलमान एकत्रित होऊ शकतात. परंतु ज्यावेळी ही खीलाफतची संज्ञा एका विशिष्ट बादशाहच्या नावाशी जोडली जावू लागली, तेव्हा त्यावेळी अन्य बादशाहांनी त्वरित समजून घेतले की आमच्या सत्ते मध्ये बाधा निर्माण केली जात आहे आणि ती योग्य अशी चळवळ बेकार होवून गेली. परंतु जर अशी चळवळ जनसामान्यातून

निर्माण झाली आणि त्याला धार्मिक अधिष्ठान देखील प्राप्त होत असेल, तर राजकीय सत्ता स्पर्धा याच्या मार्गात बाधा निर्माण करणार नाही. फक्त जमाअती स्पर्धा याच्या मार्गात अडथळा बनू शकेल. राजकीय स्पर्धेमुळे अशी चळवळ त्या एकाच देशामध्ये मर्यादित होऊन राहिल, ज्याची सरकार याच्या समर्थनात उभे राहिल. परंतु जमाअतीच्या विरोधाच्या बाबतीत ते कुठल्याही देशाच्या मर्यादेत मानली जाणार नाही, तर ती प्रत्येक देशात पोहचेल आणि प्रसार पावेल आणि आपला पाया घट्ट करत जाईल. किंबहुना अशा देशात देखील जाऊन यशस्वी होईल, जेथे इस्लामी शासन नाही. कारण राजकीय टकराव नसल्यामुळे सुरूवातीच्या काळामध्ये शासन याला विरोध करणार नाही. म्हणून अहमदियतचा इतिहास या गोष्टीला साक्षी आहे. अहमदियतचा उद्देश फक्त मुसलमानांमध्ये एकता निर्माण करणे होता. त्याला बादशाहतची अपेक्षा नव्हती. ती सत्ता ग्रहण करू इच्छित नव्हती. इंग्रजांनी अनेक वेळा आपल्या देशामध्ये अहमदियतला त्रास देखील दिला आहे. परंतु शुध्द धार्मिक चळवळ असल्यामुळे, त्यांनी उघडउघड संघर्षाची भुमिका घेतली नाही. अफगानिस्तानच्या मुल्लांना भिऊन काही बादशाहनी सक्ती केली, परंतु खाजगी भेटीमध्ये त्यांनी आपली विवशता देखील जाहिर केली आणि पश्चाताप देखील व्यक्त केला. अशाच प्रकारे दुसऱ्या इस्लामी देशात देखील जनसामान्यांनी विरोध केला, मौलवींनी विरोध केला आणि त्यांना भिवून सरकारने देखील काही वेळा अडथळे निर्माण केले. परंतु कुठल्याही सरकाराने अशी समजूत करून घेतली नाही, की ही चळवळ आमची सत्ता उलथून टाकण्यासाठी स्थापन झाली आहे आणि त्यांचा हा विचार अगदी बरोबर होता.

अहमदियतला राजकारणाशी काही कर्तव्य नाही. अहमदियत एकाच उद्देशाने उभी आहे, ते म्हणजे मुसलमानांच्या धार्मिक परिस्थितीला सुधारावे आणि त्यांना एका नात्यामध्ये गुंतवावे; जेणे करून ते एकत्र येवून इस्लामच्या शत्रूचा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक

साधनाने सामना करू शकतील. याच गोष्टीला ध्यानात ठेवून अहमदी प्रचारक अमेरिकेत गेले. ज्या प्रमाणात ते आशियाई लोकांचा विरोध करत होते, त्याच प्रमाणात त्यांनी अहमदी प्रचारकांचा ही विरोध केला. परंतु धार्मिक चळवळीच्या प्रश्नाच्या अनुषंगाने त्यांनी विरोध केला नाही. डच सत्ताधारींनी इंडोनेशिया मध्ये देखील याच पध्दतिचा अवलंब केला. जेव्हा त्यांनी पाहिले, की राजकारणात हे लोक आमच्या हितांच्या आड येत नाहीत, जरी त्यांनी छुपी पाळत ठेवली, दुर्लक्षही केले. परंतु उघडउघड अहमदियतशी विरोध पत्करण्याची आवश्यकता समजली नाही. आणि हा त्यांचा व्यवहार अतिशय योग्य होता. तसे पाहिल्यास आम्ही त्यांच्या धर्माच्या विरूध्द प्रचार करत होतो. म्हणून आम्ही त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारच्या सहानुभूतीची अपेक्षा करत नव्हतो. परंतु आम्ही त्यांच्या राजकारणाशी प्रत्यक्ष संघर्ष देखील करत नव्हतो, म्हणून त्यांना देखील आमच्या विरूध्द उघडपणे संघर्ष करण्याचा अधिकार पोहोचत नव्हता. याचा परिणाम असा झाला, की आता अहमदिया मुस्लिम जमाअत जवळपास सर्वच देशांमध्ये स्थापित आहे. भारतामध्येही, अफगानिस्तान मध्येही, ईरान, इराक, सिरीया, पॅलेस्टीन मध्येही, इजिप्त, इटली, स्वीटझरलैंड, जर्मनी, इंग्लंड, यु.एस.ए, इंडोनेशिया, मलाया, पूर्व व पश्चिम आफ्रिका थोडक्यात सर्वच देशांमध्ये अल्प किंवा मोठया प्रमाणात जमाअत अस्तित्वात आहे. (हे १९४८ मधील लिखाण आहे या नंतरच्या काळात अहमदिया मुस्लिम जमाअत जगातील इतर अनेक देशात (२१३) स्थापन झाली आहे) आणि या देशातील मूळ निवासींमध्ये जमाअतचे अस्तित्व आहे; असे नाही, की तेथील काहीं भारतीय लोकांनीच अहमदिया जमाअत मध्ये दीक्षा घेतली असावी आणि ते इतके निष्ठावंत लोक आहेत, की त्यांनी आपले जीवन इस्लामच्या सेवेसाठी समर्पित केले आहे. एक इंग्रज लेफटिनेंट आपले जीवन समर्पित करून आज इंग्लंड मध्ये प्रचारक म्हणून कार्यरत आहेत.नियमित नमाज अदा करतात, दारू वैगरे अंमली

पध्दार्थांच्या जवळ जात नाहीत. स्वत: कष्ट करून पैसे कमवतो आणि हस्तपत्रके वैगेरे प्रसिध्द करतो किंवा सम्मेलने भरवतो. आम्ही त्याला पोटगी म्हणून इतकी अल्प रक्कम देतो, ज्यापेक्षा अधिक इंग्लंड मधील एखादा सफाई कर्मचारी देखील कमावतो. त्याचप्रमाणे जर्मनीतील एका व्यक्तिने आपले जीवन समर्पित केले आहे. तो देखील सेना अधिकारी आहे. मोठया प्रयत्नानंतर तो जर्मनीतून बाहेर पडण्यात यशस्वी झाला आहे. नुक्तेच कळाले आहे, की तो स्वीटझरलैंड मध्ये पोहोचला असून तेथे 'विझा'ची प्रतिक्षा करत आहे. हा युवक इस्लामच्या सेवेसाठी अमर्याद स्फूर्ति आपल्या मनामध्ये बाळगतो आणि तो पाकिस्तान मध्ये येत असून, येथे इस्लामचे शिक्षण प्रशिक्षण पूर्णपणे प्राप्त केल्यानंतर तो अन्य देशांमध्ये इस्लामचे प्रचार करू इच्छितो.

जर्मनीतील आणखीन एक तरूण लेखक आणि त्याची उच्चशिक्षित पत्नी, दोघे आपले जीवन समर्पित करण्याचा विचार करत आहेत. अपेक्षा आहे, की लवकरच ते आपला निर्णय पक्का करून पाकिस्तानला इस्लामचे शिक्षण घेण्यासाठी हजर होतील.

अशाच प्रमाणे हॉलेंडचा एक तरूण इस्लामसाठी आपले जीवन समर्पित करण्याची इच्छा बाळगतो आणि अपेक्षा आहे, की लवकरच तो कोणत्या ना कोणत्या देशात इस्लामच्या प्रचार कार्यात कार्यरत होईल. नि:संशय अहमदिया मुस्लिम जमाअत अल्प संख्य आहे; परंतु हे पाहणे महत्त्वाचे आहे, की हिच्या माध्यमातून जमाअत-ए-इस्लामी स्थापन होत आहे. प्रत्येक देशातून काहीं ना काहीं लोक जमाअत मध्ये प्रवेश करून एक वैश्विक संघटना निर्माण करण्याचा पाया रचत आहेत. आणि प्रत्येक राजकीय विचारांना मान्यता देणाऱ्या लोकांपैकी काहीं ना काहीं लोक यात प्रवेश करत आहेत. अशा चळवळींची सुरूवात आरंभात अशी छोटीशी असते, परंतु काहीं काळानंतर त्याला मोठे सामर्थ्य प्राप्त होते आणि थोडया कालावधीतच एकता आणि एकात्मतेचे बीजारोपण करण्यात यशस्वी होत असते. उघडच आहे, की राजकीय सामर्थ्यासाठी

राजकीय संघटनांची आवश्यकता असते आणि धार्मिक आणि सांस्कृतिक सामर्थ्यासाठी धार्मिक आणि सांस्कृतिक संघटनांची आवश्यकता असते. अहमदिया मुस्लिम जमाअत याच कारणाने राजकारणापासून अलिप्त राहते, कारण की जर ती या गोष्टीत दखल देऊ लागली तर ती आपल्या कार्यात सुस्त होऊन जाईल.

## अहमदिया मुस्लिम जमाअतचा कृती कार्यक्रम

दुसरा प्रश्न कार्यक्रमाचा आहे. कार्यक्रमाच्या दृष्टीने देखील अहमदिया मुस्लिम जमाअतच एक संघटित कार्यक्रम धारण करून आहे आणि अन्य कुठल्याही जमाअतीकडे संघटीत कार्यक्रम नाही. अहमदिया मुस्लिम जमाअत ख्रिश्चनांच्या आक्रमणांचा पूर्ण अंदाज लावून प्रत्येक देशात त्याचा सामना करत आहे. सद्यपरिस्थितीत जगातील सर्वात भूभाग आणि काहीं दृष्टीने सर्वात शक्तिशाली भूभाग आफ्रिका आहे. ख्रिस्ती धर्माने सध्या आपल्या संपूर्ण सामर्थ्यानिशी आफ्रिकेमध्ये हल्ला केला आहे. आता तर ते उघडउघड आपल्या मनोकामना स्पष्ट करत आहेत. या पूर्वी फक्त त्यांच्या धर्मगुरुंचे लक्ष तिथे केंद्रीत होते, पुढे इंग्लंड मधील कंनझरवेटीव पार्टी तिकडे आकर्शित झाली आणि आता लेबर पार्टीनी देखील घोषणा केली आहे, की युरोपच्या मुक्तीची भिस्त आफ्रिकेच्या विकासावर आणि त्याच्या व्यवस्थेवर अवलंबून आहे. परंतु युरोपचा असा समज होता, की हा विकास आणि हे व्यवस्थापन अशाच परिस्थितीत युरोपसाठी लाभदायक होतील, जेव्हा तेथील मूळ निवासी ख्रिस्तीधर्मी होतील. अहमदिया मुस्लिम जमाअतने हे गुपित २४ वर्षा पूर्वीच जाणून घेतले होते. आणि २४ वर्षा पूर्वीच आपले प्रचारक तेथे पाठवून दिले आणि तेथे हज्जरो लोकांनी ख्रिस्ती धर्मातून बाहेर पडून इस्लाम धर्म स्वीकारला. आणि या वेळी आफ्रिके मध्ये सर्वात सुसंघटीत इस्लामी जमाअत अहमदिया मुस्लिम जमाअतच आहे, ज्याचा सामना करण्यापासून ख्रिस्ती लोक आता टाळाटाळ करत

आहेत. आणि त्यांच्या प्रचार साहित्यात आता नेहमीच या गोष्टीचा उल्लेख केला जात आहे की, अहमदिया मुस्लिम जमाअतच्या प्रयत्नांनी ख्रिस्ती मिशनरींच्या प्रयत्नांना अटकाव केला आहे. हेच प्रचारकार्य पूर्वी आफ्रिके मध्ये देखील वर्षानुवर्षे जारी आहे आणि जरी तेथील कार्य हे प्रारंभिक स्वरूपात आहे आणि त्यामुळे परिणाम इतके उल्लेखनीय नाहीत, जितके पश्चिम आफ्रिके मध्ये आहेत, तरी देखील ख्रिस्ती लोकांपैकी काही लोक मुसलमान होण्यास सुरूवात झाली आहे आणि अपेक्षा आहे, की येथे देखील काहीं वर्षांत, येथील प्रचारकांच्या प्रयत्नांना मोठे यश प्राप्त व्हायला सुरूवात होईल. इंडोनेशिया आणि मालाया मध्ये दीर्घकाळापासून मिशन स्थापन आहे आणि इस्लाम पासून पळून जाणाऱ्या गटांना रोखण्याचे, संघटित करण्याचे आणि एकत्रितपणे शत्रूचा सामना करण्यासाठी उभा करण्याचे प्रयत्न चालू आहे. यु.एस.ए ख्रिस्तींच्या सर्वात मोठया शक्तिच्या स्वरूपात आता पुढे आली आहे. तेथे देखील २४ वर्षापासून अहमदी प्रचारक कार्यरत आहेत आणि हजारो अमेरिकन नागरिक अहमदिया जमाअत मध्ये सामील झाले आहेत आणि हजारो रूपये इस्लामच्या प्रचारकार्यात खर्च करत आहेत. अमेरिकेच्या संपत्तीच्या दृष्टीने हे काहीच नाही आणि तेथील ख्रिस्ती धर्मगुरुंच्या तुलनेत हे अतिशय अल्प प्रयत्न आहे. परंतु प्रश्न असा आहे, की सामना तर सुरू केला आहे आणि आम्हाला यश प्राप्त होत आहे. कारण आम्ही ख्रिस्ती लोकांमधून काहीं लोकांना इस्लामकडे वळवण्यात यश प्राप्त केले आहे. आणि ख्रिस्ती लोक आमच्यापैकी कोणालाही त्यांच्याकडे ओढण्यात यशस्वी होत नाहीत. म्हणून असे म्हणणे बरोबर नाही, की अहमदींनी एक नवीन जमाअत का स्थापन केली आहे. तर असे म्हणणे योग्य राहील, की अहमदियतने एक जमाअत स्थापन केली असून त्यापूर्वी कोणतीही जमाअत अस्तित्वात नव्हती. मग काय ही गोष्ट आक्षेपार्ह आहे का स्तूतीस पात्र आहे?

## अहमदींना दुसऱ्या संघटना पासून वेगळे ठेवण्याचे कारण

काहीं लोक असे म्हणतात, की अशी वेगळी जमाअत निर्माण करण्याची काय गरज होती. याच गोष्टी अन्य मुसलमानांमध्ये देखील प्रसारित करणे आवश्यक होते. याचे बौध्दिक उत्तर तर हे आहे, की एक सेनापती त्याच लोकांना युध्दा मध्ये पाठवू शकतो, जे सेनादलात भरती झाले आहेत. जे लोक सैन्यांमध्ये भरती नाहीत त्यांना तो कसे काय पाठवू शकेल. जर जमाअतच स्थापन झाली नसती, तर अहमदिया जमाअतचे संस्थापक कोणाकडून काम करून घेऊ शकले असते. आणि कोणाला त्यांनी आदेश दिला असता? तसेच त्यांचे खलीफा कोणाकडून कार्य करून घेऊ शकले असते आणि त्यांनी कोणाला आदेश दिला असता. काय त्यांनी बाजारात फिरून प्रत्येक मुसलमानाला पकडून म्हणू शकले असते का, की आज अमुक ठिकाणी इस्लामसाठी आवश्यकता आहे, तू तेथे जा आणि त्यांनी उलट उत्तर दिले असते, की मी तुझे म्हणणे ऐकण्यास तयार नाही. मग तो पुढल्या व्यक्तिला जाऊन धरून आणि मग त्याच्या पुढच्या व्यक्तिला जावून धरून हेच म्हणत राहिले असते. ही एक बौध्दिक वास्तविकता आहे, की जेव्हा कुठलेही कार्य सुसंघटितपणे करण्याची आवश्यकता असते, तेव्हा एक संघटनेच्या स्थापनेची गरज असते. एखाद्या संघटने शिवाय कुठलेही कार्य सुव्यवस्थित पणे केले जाऊ शकत नाही. जर ते असे म्हणत असतील, की जमअतची स्थापना केली असले तरी सर्वात मिळून मिसळून राहता आले असते; तर याचे उत्तर असे आहे, की आपले जीव धोक्यात घालून कार्य करण्यासाठी प्रत्येक व्यक्ति कोठे तयार असते, असे कार्य तर ते ध्येय वेडेच करू शकतात आणि अशा ध्येय वेडयांना चतूर लोकांपासून अलग ठेवणे आवश्यक असते. जर चतूर लोक या वेडयांना देखील आपल्या सारखेच बनवू लागले, तर मग असे कार्य कोण करेल? तसेच दुसऱ्यांपासून वेगळे ठेवणे आपोआप स्वभावामध्ये उत्सुकता निर्माण करते आणि आपोआप लोक या गोष्टीला जाणून घेण्यासाठी उद्युक्त होतात आणि

सरतेशेवटी एक दिवस स्वत:च या गोष्टीत गुरफटले जातात, ज्याला नष्ट करण्यासाठी ते पुढे आलेले असतात. थोडक्यात हे सर्व आक्षेप सखोल चिंतन न करण्याचा परिणाम आहे. जर बुध्दीचा वापर केल्यास हे समजणे कठीन नाही की जमाअत-ए-अहमदियाने धारण केलेले धोरण आणि पध्दतच उचित आहे. याच यथायोग्य धोरणावर कार्यरत झाल्याने तिला इस्लामसाठी सर्वस्व त्याग करणाऱ्या लोकांची एक जमाअत निर्माण करण्यात यश आले आहे. आणि जोपर्यंत ती या कार्यपध्दतिने कार्य करत राहिल, तोपर्यंत दररोज अशा लोकांची संख्या वाढत जाईल. आणि शेवटी काफिर अनुभवू लागतील, की आता इस्लामने सामर्थ्य धारण केले आहे आणि मग तो इस्लामवर आपल्या सर्व शक्तिनिशी हल्ला करेल; परंतु हल्ला करण्याची वेळ निघून गेलेली असेल आणि रंणागण इस्लामच्या ताब्यात राहिल आणि नकारणारे पराभूत होतील.

आम्ही राजकीय प्रयत्न करणाऱ्यांच्या मार्गात अडथळा निर्माण करत नाही; आम्ही त्यांना एवढेच म्हणतो, की जो पर्यंत तुम्हाला आम्ही सांगितलेल्या गोष्टीं समजणार नाहीत तो पर्यंत तुम्ही आपले कार्य करत रहा. परंतु आम्ही त्यांच्याकडून अशी अपेक्षा देखील करतो, की त्यांनी आमच्या मार्गात अडथळे निर्माण करू नये. जर एखाद्याला त्यांची कार्यपद्धती आवडत असेल, तर त्यांच्यात सामील होऊ शकतो आणि जर एखाद्याला आमची कार्यपद्धती योग्य वाटत असेल तर तो आमच्यात सामील होईल. त्यांच्या कार्यपद्धतीत त्याग कमी आणि प्रसिध्दी जास्त आहे आणि आमच्यात कार्यपद्धती मध्ये त्याग अधिक आणि प्रसिध्दी कमी आहे. त्यांना त्यांचा वाटा मिळत राहील आणि आम्हाला आमचा वाटा मिळत राहील. ज्यांच्या दृष्टीकोनात गाभा आणि वास्तविकेतच्या दृष्टिने इस्लामची प्रस्थापना अधिक महत्त्वाची वाटत असेल, ते आमच्यात सामील होतील आणि जे लोक भौतिक राजेशाहीचे इच्छिुक असतील, ते त्यांच्यात सामील होतील. तर मग आम्ही आपसात का लढावे आणि का भांडणे करावेत? दोघेही समाजाच्या हितासाठी धडपडत आहेत,

जरी वेगवेगळया अवयवांमध्ये वेदना होत आहेत. त्यांच्या मेंदू मध्ये वेदना आहे आणि आमच्या हृदया मध्ये वेदना आहे.

हे तर मी फक्त बौध्दिक दृष्टिने उत्तर दिले आहे. आता मी आध्यात्मिक दृष्टिकोनातून उत्तर देत आहे आणि माझ्या दृष्टिने तोच वास्तविक दृष्टिकोन आहे.

या प्रश्नाचे आध्यात्मिक उत्तर असे आहे, की परमेश्वराची प्राचीन काळापासून ही कार्यपद्धत राहिली आहे, की ज्या ज्यावेळे जगामध्ये बिघाड निर्माण होतो, आध्यात्मिकता त्यातून नष्ट होऊ लागते, लोक भौतिकतेला धर्मावर प्राधान्य देऊ लागतात, त्यावेळी परमेश्वर आपल्या भक्तांच्या उपदेशासाठी आणि मार्गदर्शनासाठी आकाशातून एखाद्या सुधारकाची नियुक्ती करतो; जेणे करून ते त्याच्या भरकटलेल्या भक्तांना त्याच्याकडे माघारी आणतील आणि त्याने अवतरीत केलेल्या धर्माला जगामध्ये पुनर्स्थापित करतील. काहीं वेळा हे प्रेषीत धर्मशास्त्र सोबत घेऊन येतात आणि काही वेळा पूर्वीच्याच धर्मशास्त्राला पुनर्स्थापित करण्यासाठी येतात. पवित्र कुरआना मध्ये परमेश्वराच्या या कार्यपध्दतीवर विशेषत्त्वाने भर देण्यात आला आहे आणि वारंवार मानवमात्रांसाठी परमेश्वराच्या दये आणि कृपेला ओळखण्याकडे आकर्शित केले आहे.

यात काहीच शंका नाही, की परमेश्वर फार सामर्थ्यशाली आहे आणि मानवप्राणी त्याच्या तुलनेत एखाद्या कीटकापेक्षाही क्षुद्र आहे. परंतु या गोष्टीत देखील काही शंका नाही, की परमेश्वराचे सर्व कार्य विवेकपूर्ण असते आणि तो कुठलेही कार्य विनाकारण आणि निरर्थकपणे करत नाही. परमेश्वर पवित्र कुरआना मध्ये म्हणतो की,

وَمَا خَلَقْنَا السَّمٰوٰتِ وَالْاَرْضَ وَمَا بَيْنَهُمَا لٰعِبِيْنَ

(दुख्खान :३९)

अर्थात आम्ही ही पृथ्वी आणि आकाश विनाकारण निर्माण केलेले नाहीत उलट त्यांच्या निर्मितीमध्ये विशिष्ट असा उद्दिष्ट आहे आणि

तो उद्देश हाच आहे, की मानवाने परमेश्वराच्या गुणविशेषांचे प्रदर्शन करावे आणि त्याचे प्रारूप होऊन जगातील अशा लोकांना, ज्यांच्यात उंच भरारी घेण्याची शक्ति नाही, परमेश्वराचा परिचय करून द्यावा. अगदी आरंभापासून आजच्या काळापर्यंत परमेश्वराची हीच कार्यपध्दती (सुन्नत) कायम आहे. वेगवेगळया काळामध्ये आपले वेगवेगळे प्रारूप या जगामध्ये प्रकट केले आहे. कधी परमेश्वराचे गुणविशेष आदम (अ.स.) पासून प्रकट झाले कधी नूह (अ.स.) पासून प्रकट झाले कधी इब्राहिमी शरिरात ते प्रकट झाले तर कधी मूसवी शरीरामध्ये ते प्रदर्शित झाले कधी दाउद (अ.स.) ने परमेश्वराचा चेहरा जगाला दाखविला तर कधी येशू मसीहने परमेश्वराचे तेज आपल्या व्यक्तीवातून प्रकट केले. सर्वात शेवटी आणि सर्वात परिपूर्णपणे हज़रत पैगंबर महंमद (स.) यांनी परमेश्वराच्या सर्वच गुणविशेषांना संक्षेपाने आणि विस्ताराने, वयैक्तिक स्वरूपात आणि सामूहिक स्वरूपात देखील इतक्या भव्य आणि दिव्यपणे जगासमोर प्रकट केले, की तत्पूर्वीचे प्रेषीत हज़रत महंमद (स.) च्या सौर्यरूपापुढे नक्षत्रासमान टिमटिमू लागले. हज़रत महंमद पैगंबरानंतर सर्व धर्मशास्त्र संपुष्टात आले आणि सर्व धर्मशास्त्र घेऊन येणाऱ्या प्रेषीतांचा मार्ग बंद करण्यात आला. हे कुठल्याही पक्षपातामुळे किंवा भिडेखातर नव्हे तर हज़रत महंमद पैगंबर (स.) असे धर्मशास्त्र घेऊन आले, जे संपूर्ण आवश्यकतांची परिपूर्ति आणि सर्व गरजांची परिपूर्ति करणारे होते. जी गोष्ट परमेश्वराकडून अवतरीत होणार होती, ती परिपूर्ण झाली. परंतु भक्तांकडून अशी हमी नव्हती, की ते रास्त मार्गाला सोडणार नाहीत आणि या खऱ्या शिकवणीला विसरणार नाहीत. याउलट पवित्र कुरआन मध्ये अल्लाहने स्पष्ट म्हटले आहे की,

يُدَبِّرُ الْاَمْرَ مِنَ السَّمَاءِ اِلَى الْاَرْضِ ثُمَّ يَعْرُجُ اِلَيْهِ فِىْ يَوْمٍ
كَانَ مِقْدَارُهٗۤ اَلْفَ سَنَةٍ مِّمَّا تَعُدُّوْنَ

(सजदा:६)

अर्थात परमेश्वर आपल्या या शेवटच्या वचनाला आणि आपल्या या शेवटच्या धर्मशास्त्राला आकाशातून पृथ्वीवर स्थापन करेल आणि लोकांचा विरोध त्याच्या मार्गात अडसर निर्माण करणार नाही. परंतु एक कालावधी नंतर हे वचन परत आकाशाकडे मार्गरत होईल आणि एक हजार वर्षानंतर या जगातून लुप्त होईल. हज़रत महंमद पैगंबर (स.) या धर्मस्थापनेच्या कालावधीला तीनशे वर्षाचा काळ ठरवतात, जसे की वर पैगंबर वचनात नमूद करण्यात आले आहे. आणि पवित्र कुरआन मध्ये 'अलीफ लाम मीम रा' च्या द्वारे दोनशे एकाहत्तर वर्षाचा कालावधी यासाठी ठरवला गेला आहे. या बरोबर जर एक हजारचा काळ धर्माचे आकाशाकडे उर्ध्वगमनाचा काळ जोडल्यास १२७१ वर्ष होतात, जे की तेराव्या शताब्दीचा शेवटचा काळ आहे. जसे की पवित्र कुरआनामध्ये स्पष्ट केले आहे, की अशा काळामध्ये परमेश्वराकडून निश्चितच एक सुधारक आणि मार्गदर्शक अवतरित होत असतो, जेणे करून हे जग नेहमीकरिता सैतानाच्या ताब्यामध्ये जाणार नाही आणि परमेश्वराची सत्ता या जगामधून नेहमीसाठी नष्ट होणार नाही. म्हणून आवश्यक होते, की या काळासाठी ईश्वराकडून कोणीतरी व्यक्ति यायला हवी होती. तो कोणीही असता, तरी त्याचे येणे आवश्यक होते. हे कसे शकय होते, की जेव्हा आदमच्या अनुयायांमध्ये बिगाड निर्माण झाला, त्याची दखल परमेश्वराने घेतली, नूहच्या अनुयायांमध्ये बिगाड निर्माण झाला त्याची दखल परेमश्वराने घेतली, इब्राहिमच्या अनुयायांमध्ये बिगाड निर्माण झाला त्याची दखल परेमश्वराने घेतली, मूसाच्या अनुयायांमध्ये बिगाड निर्माण झाला त्याची दखल परेमश्वराने घेतली, इसाच्या अनुयायांमध्ये बिगाड निर्माण झाला त्याची दखल परेमश्वराने घेतली, परंतु सर्व प्रेषितांचे सरदार हज़रत महंमद (स.) यांच्या अनुयायींमध्ये बिगाड निर्माण झाला, तर परमेश्वर त्याची दखल घेणार नाही, हे कसे शकय आहे? हज़रत महंमद पैगंबर (स.) यांच्या

अनुयायींच्या संदर्भात तर अशी भविष्यवाणी होती, की छोटे छोटे बिगाड जरी निर्माण झाले तर त्याच्या निवारणासाठी त्यांच्या अनुयायींमध्ये प्रत्येक शतकाच्या आरंभी एक सुधारक (मुजद्दीद) अवतरीत केला जाईल. हे कुठल्याही बुध्दीला पटू शकते काय, की छोटे छोटे बिगाड दूर करण्यासाठी तर परमेश्वराकडून सुधारक येत राहिले, जसे की, महंमद पैगंबरांनी म्हटले आहे,

اِنَّ اللّٰہَ یَبْعَثُ لِھٰذِہِ الْاُمَّۃِ عَلٰی رَأْسِ کُلِّ مِائَۃِ سَنَۃٍ
مَّنْ یُّجَدِّدُلَھَا دِیْنَھَا

(अबु दाऊद खंड २ पा.२४१)

अर्थात: या माझ्या अनुयायींमध्ये प्रत्येक शतकाच्या आरंभी असे सुधारक येतील, जे या अनुयायीसंघाचे नवनिर्माण करतील. अर्थात जे काही बिगाड निर्माण होतील त्याचे निवारण करून पूर्ववत करतील. परंतु या भयानक अशा उत्पाताच्या काळामध्ये ज्या संदर्भात महंमद पैगंबर (स.) यांनी फरमाविले आहे, की जेव्हा पासून या जगात प्रेषित येत गेले त्या सर्वांनी या उत्पाताची वार्ता: देत राहिली आहे. मग अशा परिस्थितीत कोणी मार्गदर्शक कोणी अवतार पुरूष न यावा, जो मुसलमानांना संघटीत करण्यासाठी परमेश्वराकडून कुठलाही आवाज उठणार नाही? असे कसे शक्य आहे. मुसलमानांना अंधकाराच्या खाईतून वर काढण्यासाठी आकाशातून कोणताही दोर सोडला जाणार नाही, हे कसे शकय आहे. तो परमेश्वर जो सृष्टीच्या आरंभापासून आपल्या दयेचे आणि कृपेचे प्रदर्शन करत आला आहे, महंमद पैगंबर (स.) यांच्या प्रकटीकरणानंतर या दये व कृपेचा स्त्रोत अधिक उफाणावर आला आहे, ना की त्याची दया व कृपा लोप पावली आहे. जर परमेश्वर कधी काळी दयाळू होता, तर तो महंमद (स.) यांच्या अनुयायींसाठी पहिल्यापेक्षा अधिक दयाळू आणि कृपाळू असायला हवा आणि निश्चितच तो तसाच आहे. पवित्र कुरआन आणि पैगंबर वचनांमध्ये (हदीस) या गोष्टीची साक्ष उपलब्ध

आहे, की महंमद (स.) यांच्या अनुयायींमध्ये ज्या ज्यावेळी बिगाड निर्माण होईल त्या त्यावेळी परमेश्वर आपले उपदेशक आणि मार्गदर्शक प्रकट करत राहील. विशेषतः या शेवटच्या काळामध्ये जेव्हा दज्जालचा उपद्रव प्रकट होईल, ख्रिस्ती धर्माचे प्रभुत्व स्थापित होईल, इस्लाम सकृतदर्शनी निष्प्रभ होईल आणि मुसलमान आपल्या धर्माला सोडून इतर समाजाच्या प्रथा आणि परंपरा स्वीकारतील, त्यावेळी महंमद (स.) यांचा एक परिपूर्ण अभिरूप प्रकट होईल आणि या काळात सुधारणेचे कार्य करेल, ज्याच्या संदर्भात महंमद पैगंबर (स.) यांनी म्हटले आहे,

لَا يَبْقٰى مِنَ الْاِسْلَامِ اِلَّا اِسْمُهٗ وَلَا يَبْقٰى مِنَ الْقُرْاٰنِ اِلَّا رَسْمُهٗ

(मिश्कात-किताबुल इल्म)

अर्थात - इस्लामचे फक्त नाव शिल्लक राहील आणि पवित्र कुरआनचे फक्त अक्षरच शिल्लक राहतील, इस्लामचा गाभा कोठेच दिसणार नाही आणि पवित्र कुरआनाचा अर्थ कोणावर ही प्रकाशित होणार नाही.

म्हणून हे प्रिय जनहो! अहमदिया संप्रदायाची स्थापना याच पुरातन परंपरेनुसार झालेली आहे आणि याच भविष्यवाणींच्या अनुसार झाली आहे, ज्या महंमद (स.) आणि त्यांच्या पूर्वीच्या प्रेषीतांनी या काळाच्या संदर्भात केलेल्या होत्या. जर का मिर्ज़ा साहेबांची निवड या कार्यासाठी योग्य नव्हती, तर हा आक्षेप परमेश्वरावर येईल, मिर्ज़ा साहेबांचा यात काय दोष? परंतु जर परमेश्वर, जो अदृष्याचा ज्ञाता आहे आणि कुठलेही रहस्य त्याच्यापासून लपलेले नाही आणि त्याचे सर्व कार्य विवेकपूर्ण असतात, तर मग हे समजून घेतले पाहिजे, की मिर्ज़ा गुलाम अहमद कादियानी (अ.स.) यांची निवड हीच योग्य निवड होती आणि त्यांच्यावर श्रध्दा धारण्यामध्येच मुसलमानांची आणि या विश्वाची भलाई आहे. ते या जगासाठी कुठलाही नवीन संदेश घेऊन आलेले नाहीत, तर तोच संदेश जो महंमद पैगंबर (स.) यांनी या जगाला दिला होता, परंतु हे जग तो संदेश विसरून गेला होता,

तोच संदेश जो पवित्र कुरआन मधून प्रकट झाला होता, परंतु जगाने त्याकडे पाठ फिरविली होती आणि तो हाच संदेश आहे, की या संपूर्ण सृष्टीचा निर्माता एक परमेश्वर आहे. त्याने मानवाला आपल्या प्रेम आणि घनिष्ठ संबंधासाठी जन्म दिला आहे. आपल्या गुणविशेषांना त्याच्या माध्यमातून प्रकट करण्यासाठी त्याची निर्मिती केली आहे, जसे की तो म्हणतो,

وَاِذْ قَالَ رَبُّكَ لِلْمَلٰٓئِكَةِ اِنِّيْ جَاعِلٌ فِي الْاَرْضِ خَلِيْفَةً

(सुरह बकरा:३१)

अर्थात-आणि जेव्हा तुझ्या विधात्याने आपल्या दूतांना म्हटले, की मी पृथ्वीवर माझा प्रतिनिधी नियुक्त करणार आहे.

आणि त्याची संतती परमेश्वराची उत्तराधिकारी आहे अर्थात प्रतिनिधी आहे. ते परमेश्वराच्या गुणविशेषांना जगासमोर प्रकट करण्यासाठी उपजले आहेत. म्हणून सर्व मानवमात्रांचे हे कर्तव्य आहे, की त्यांनी आपले जीवन परमेश्वराच्या गुणविशेषांनुसार बनवावे आणि ज्याप्रकारे एक प्रतिनिधी आपल्या सर्वकार्यांमध्ये आपल्या मूळ स्त्रोताकडे वारंवार लक्ष देतो आणि एक दास आपले प्रत्येक पाऊल उचलण्यापूर्वी आपल्या स्वामीकडे पाहतो त्याच प्रकारे मानवाचे देखील कर्तव्य आहे की त्याने परमेश्वराशी असा संबंध प्रसथापित करावा, की जेणे करून परमेश्वर त्याला पावलो पावली आणि प्रत्येक कार्यात मार्गदर्शन करत राहील आणि प्रत्येक गोष्टीपेक्षा तो त्याला सर्वाधिक प्रियतम असावा आणि प्रत्येक बाबतीत तो त्याच्यावर विसंबून राहणारा असावा आणि याच कर्तव्याच्या पूर्तिसाठी हज़रत अपेक्षित मसीहा या जगात प्रकट झाले त्यांचे हे कर्तव्य होते, की त्यांनी भौतिकतावादी लोकांना धर्मनिष्ठ बनवावे, इस्लामची अधिसत्ता त्यांच्या मन-मस्तिष्कावर निर्माण करावी आणि महंमद (स.) यांना परत एकदा त्यांच्या आध्यात्मिक सिंहासनावर विराजमान करावे, ज्या सिंहासनावरून त्यांना खाली खेचण्यासाठी

सैतानीशक्ति आतून आणि बाहेरून हल्ले करत आहेत.

या उद्देशाच्या परिपूर्तिसाठी हज़रत अपेक्षित मसीह यांनी सर्वप्रथम हे कार्य केले, की मुसलमानांना बाह्य आवरणा ऐवजी (टरफल) आतील गाभ्याकडे आकर्शित केले आणि या गोष्टीवर भर दिला, की आदेशांचा दर्शनीय भाग देखील महत्त्वाचा आणि आवश्यक आहे, परंतु अंतर्गत भागाकडे ध्यान दिल्याशिवाय मानव कोणतीही प्रगती करू शकत नाही. म्हणून त्यांनी एक संघटना स्थापन केली आणि दीक्षा वचनात एक अट ठेवली, की मी धर्माला भौतिकतेवर प्राधान्य देईन. वास्तविक पाहता हाच आजार मुसलमांनाना होता, जो वाळवी सारखा पोखरत होता जरी भौतिक ताकद त्यांच्या हातून निसटली होती, तरी देखील त्यांचे सर्व ध्यान भौतिकतेकडेच होते. इस्लामच्या प्रगतीचा अर्थ त्यांच्या दृष्टीने राजेशाहीची स्थापना हाच राहिला होता आणि इस्लामच्या यशस्वीतेचा अर्थ त्यांच्या दृष्टीने मुसलमान म्हणवल्या जाणाऱ्यांची शैक्षणिक आणि व्यवसायिक प्रगती, हाच राहिला होता. वास्तविक पाहता हज़रत महंमद पैगंबर (स.) जगात यासाठी अवतरले नव्हते, की लोक मुसलमान म्हणवले जावेत किन्तु ते लोकांना खऱ्या अर्थानी मुसलमान बनवण्यासाठी आले होते; ज्याची व्याख्या पवित्र कुरआन मध्ये

مَنْ اَسْلَمَ وَجْهَهٗ لِلّٰهِ

(सुरह बकरा:११३)

अर्थात- त्याने आपले संपूर्ण अस्तित्व परमेश्वरासाठी परित्यागीलेले असावे आणि आपल्या भौतिक गरजांना धार्मिक गरजांच्या अधीन ठेवावे, असे आहे. वरवर पाहता ही एक अतिशय क्षुल्लक गोष्ट दिसून येते, परंतु वास्तविक पाहता इस्लाम आणि अन्य धर्मांमध्ये हाच फरक आहे. इस्लाम असे म्हणत नाही, की तुम्ही ज्ञानार्जन करू नका. असेही म्हणत नाही, की तुम्ही व्यापार आणि व्यवसाय करू नका. असेही म्हणत नाही की तुम्ही कलाकुसरीची कामे करू नका. असेही म्हणत नाही, की तुम्ही आपल्या शासन व्यवस्थेला मजबूत करण्याचे प्रयत्न

करू नका. तो फक्त मानवाचा दृष्टीकोन बदलू इच्छितो. जगामध्ये प्रत्येक कार्याचे दोन दृष्टीकोन असतात एक बाह्य आवरणापासून गाभा प्राप्त करण्याचा दृष्टीकोन आणि दुसरा गाभ्यारपासून बाह्य आवरण प्राप्त करण्याचा दृष्टीकोन असतो. जी व्यक्ति बाह्य आवरणापासून गाभा प्राप्त करण्याची आशा बाळगते, ती आपला उद्देश प्राप्त करण्यात यशस्वी होईलच याची खात्री देता येत नाही उलट तो बहूतेक वेळा अयशस्वीच होतो; परंतु जी व्यक्ति गाभा प्राप्त करते, त्याला बाह्य आवरण आपोआपच मिळत असते. हज़रत पैगंबर महंमद (स.) आणि त्यांच्या अनुयायींचे सर्व प्रयत्न धर्मासाठी होते, परंतु ते भौतिक समृध्दी पासून देखील वंचित नव्हते. ही तर एक नैसर्गिक बाब आहे, की ज्या लोकांना धर्म प्राप्त होईल त्यांच्या मागे भौतिक जग दासीप्रमाणे पळत येईल. परंतु भौतिकतेबरोबर धर्म सुध्दा प्राप्त होईल, हे आवश्यक नाही. काही वेळा ते प्राप्त होतही नाही आणि अनेक वेळा थोडाफार हाती असलेला धर्म सुध्दा निसटून जातो.

म्हणून हज़रत अपेक्षित मसीह यांनी प्रेषितांच्या मार्गांचे अनुकरण करत परमेश्वराच्या आदेशाने धार्मिकतेवर भर देणे सुरू केले. ज्यावेळी ते प्रकट झाले त्यावेळी मुसलमानांमध्ये दोन प्रकारचे आंदोलन चालू होते; एक आंदोलन या गोष्टीसाठी होते, की मुसलमान दुर्बळ झाले आहेत, त्यांनी भौतिक शक्ति प्राप्त करायला हवी, दुसरे आंदोलन त्यांनी सुरू केले, की आम्ही धर्माकडे लक्ष केंद्रित करायला पाहिजे. याच्या परिणामस्वरूप भौतिक शक्ति आम्हाला परमेश्वर आपोआप प्रदान करेल.

काहीं लोकांचा गैरसमज असा झाला की त्यांचे आंदोलन हे आजकालच्या सुफी वगैरेंच्या आंदोलना सारखेच आहे, जे उघडपणे नमाज आणि रोजावर भर देतात आणि भल्या चांगल्या माणसाला एकांतात बसवून बुरखाधारी स्त्रीयांप्रमाणे बनवून सोडतात. जर त्यांनी असे केले असते, तर निश्चितच त्यांनी देखील गाभ्याच्या नावाने एक

बाह्य आवरण करणारे आंदोलन सुरू केले, असे सिध्द झाले असते. परंतु त्यांनी असे केले नाही. त्यांनी जिथे धर्मादेशांवर भर दिला, तेथे या गोष्टींवर देखील भर दिला, की धर्म परमेश्वराकडून यासाठी प्रकट होत असतो, की तो मानवाच्या बुध्दीला प्रगल्भता प्रदान करून आणि त्याच्या बुध्दीमत्तेला प्रकाशित करून, त्याच्या विवेकाला तिक्ष्ण बनवेल. त्यांनी असे म्हटले, की जी व्यक्ति खऱ्या अर्थाने धर्माचरण करते आणि बनवेगिरी करत नाही धर्म त्यांच्या अंतरगांत सद्‌गुण आणि नैतिकता निर्माण करतो. धर्म त्याच्या अंतरंगात कर्मशक्ति निर्माण करतो. धर्म त्याच्या अंतरंगात त्याग आणि परोपकाराची भावना निर्माण करतो. त्यांनी असे म्हटले, की तुम्ही धर्म धारणकरा, तुम्ही नमाज अदा करा, तुम्ही उपवास करा, तुम्ही हज्ज करा, ज़कात अदा करा, परंतु तशी नमाज अदा करा जशी पवित्र कुरआनाने शिकवली आहे आणि तसे उपकार करा जसे पवित्र कुरआनाने सांगितला आहे आणि तो हज्ज करा जो पवित्र कुरआनाने सांगितले आणि ती ज़कात अदा करा जी पवित्र कुरआनने शिकविली आहे. पवित्र कुरआन तुमच्याकडून उठक बैठकची अपेक्षा ठेवत नाही आणि तो तुमच्याकडून उपाशी-तापाशी राहण्याचीही अपेक्षा ठेवत नाही. आणि आपला देश विनाकारण सोडून जाण्याचीही अपेक्षा करत नाही आणि आपले धन निष्कारण गमवण्याचीही अपेक्षा बाळगत नाही. पवित्र कुरआन, नमाजच्या संदर्भात असे म्हणतो की,

إِنَّ الصَّلٰوةَ تَنْهٰى عَنِ الْفَحْشَاءِ وَالْمُنْكَرِ وَلَذِكْرُ اللّٰهِ
أَكْبَرُ وَاللّٰهُ يَعْلَمُ مَا تَصْنَعُوْنَ

(अल अन्कबुत:४६)

अर्थात नमाज तुम्हाला व्याभिचार, नकारत्मक प्रवृत्तीपासून परावृत्त करते म्हणून जर तो अपेक्षित परिणाम नमाज पासून प्राप्त होत नसेल जो पवित्र कुरआनने सांगितला आहे, तर मग तुमची नमाज, नमाज नाही

आणि उपवासाच्या संदर्भात कुरआन असे म्हणतो

لَعَلَّكُمْ تَتَّقُوْنَ

(अल बकरा:१८४)

अर्थात- उपवास यासाठी निर्धारित केला आहे जेणे करून तुमच्यामध्ये ईशपरायणता आणि सद्गुण आणि नैतिकता उत्पन्न व्हावी. म्हणून जर तुम्ही उपवास करता, परंतु हा परिणाम दिसून येत नसेल, तर मग असे सिध्द होते की तुमची भावना विशुध्द नाही आणि तुम्ही उपवास धरत नसून स्वत:ला उपाशी ठेवत आहात. आणि परमेश्वराला तर तुम्हाला उपाशी ठेवण्यात काहीच रस नाही. हज्जच्या संदर्भात कुरआनात म्हटले आहे, की हे विद्रोही प्रवत्ती आणि मानसिकता, यापासून परावृत्त करण्यासाठी आहे आणि आपसातील भांडण तंटे नष्ट करण्याचा मार्ग आहे. म्हणून हज्ज अश्लीलता, बंडखोरवृत्ती आणि भांडण रोखण्यासाठी आहे. आणि ज़कातच्या संदर्भात म्हटले आहे की,

خُذْ مِنْ اَمْوَالِهِمْ صَدَقَةً تُطَهِّرُهُمْ وَتُزَكِّيْهِمْ بِهَا

(तौबा:१०३)

अर्थात- जकात ही व्यक्ति आणि समाजाच्या शुध्दीकरणासाठी आणि मनमस्तिष्काच्या पवित्रतेसाठी ठेवलेली आहे, म्हणून जो पर्यंत हे परिणाम उत्पन्न होत नाहीत तो पर्यंत तुमचे हज्ज आणि तुमची ज़कात हे फक्त देखावा आहे. म्हणून तुम्ही नमाज अदा करा, उपवास ठेवा, हज्ज करा, जकात द्या; परंतु तुमची नमाज आणि तुमचे उपवास आणि हज्ज मी तेव्हाच स्वीकार करेन जेव्हा त्याचा परिणाम दिसून येईल. आणि तुम्ही अश्लीलता, बंडखोरवृत्ती पासून परावृत्त व्हाल आणि तुमच्या अंतरंगात ईशपरायणता उत्पन्न होईल आणि अश्लीलता, बंडखोरवृत्ती आणि भांडण तंटया पासून तुम्ही दूर व्हाल आणि व्यक्ति आणि समाजाचे शुध्दीकरण आणि मनमस्तिष्काचे पावित्र्य तुम्हाला प्राप्त होईल. परंतु ज्या व्यक्तिमध्ये हे परिणाम दिसून येणार नाही, मी त्याला आपल्या

जमाअतचा सदस्य समजत नाही. कारण त्याने बाह्य आवरणाचा स्वीकार केला आणि गाभ्याला स्वीकारले नाही, जो परमेश्वराचा उद्देश होता.

याच प्रमाणे अन्य इतर उपासनांच्या संदर्भात देखील त्यांनी गाभ्यावर भर दिला आणि म्हटले, की इस्लामचा कुठलाही आदेश असा नाही, की जो विवेक आणि तत्त्वहीन आहे. परमेश्वर डोळयाने दिसत नाही परमेश्वर हृदयाला दिसतो, परमेश्वराला हाताने स्पर्श करता येत नाही, परमेश्वराला प्रेमाने स्पर्श करता येते. म्हणून धर्माचा हा उद्देशच नाही, की तो फक्त डोळयावर आणि हातावरच नियंत्रण करेल उलट जेव्हा तो डोळयावर आणि हातावर नियंत्रण करतो, तेव्हा तो हृदय आणि भावनांना शुध्द करण्यासाठी नियंत्रण करत असतो; जेणे करून मानवांमध्ये त्या शक्ति उत्पन्न व्हाव्यात ज्यांच्याद्वारे तो परमेश्वराला पाहू शकेल आणि ज्यांच्याद्वारे तो परमेश्वराला स्पर्श करू शकेल. आणि त्या शक्ति त्याच्या मध्ये उत्पन्न व्हाव्यात ज्यांच्याद्वारे तो परमेश्वराचे वचन ऐकू शकेल. थोडक्यात या गोष्टींवर भर देऊन त्यांनी इस्लामच्या प्रगतीचा एक नवीन मार्ग उघडला आणि त्याचा परिणाम असा झाला, की एक लहानशी संघटना निर्माण झाली. परंतु एक अशी संघटना निर्माण झाली, जीने धर्माला भौतिकतेवर प्राधान्य दिले आणि इस्लामच्या आध्यात्मिक विकासाला आणि महंमद (स.) यांच्या आध्यात्मिक बादशाहीच्या स्थापनेसाठी सर्व प्रकारचे बलीदान करण्याला सुरूवात केली. तुम्ही विचार करून पहा, की कुठे अहमदींची एक छोटीशी संघटना आणि कुठे सर्व मुसलमानांचा एक अफाट समुदाय. परंतु इस्लामच्या प्रचार आणि प्रगतीसाठी जे काही अहमदीया मुस्लिम जमाअत करत आहे, अन्य मुसलमान जे त्यांच्यापेक्षा हजारो पटीने अधिक आहेत, याच्या अर्ध्या किंवा एक चतुर्तंश भाग इतके तरी कार्य करत आहेत का? शेवटी हा बदल का झाला? याच कारणाने, की हज़रत अपेक्षित मसीह यांनी अहमदींवर दबाव आणला, की त्यांनी धर्माला भौतिकतेवर प्राधान्य द्यावे. ही वस्तुस्थिती अहमदींवर उघड झाली, तेव्हा त्यांचे कर्म एका

नव्या प्रकारचे कर्म झाले एका सच्चा अहमदीची नमाज तशी नमाज नाही, जशी एक सर्व साधारण मुसलमान नमाज अदा करतो. बाह्यरूप तेच आहे वचने तिच आहेत, परंतु गाभा अन्य आहे. अहमदी नमाजला नमाजसाठी अदा करतात आणि परमेश्वराशी संबंध दृढ करण्यासाठी नमाज अदा करतात. शकय आहे, की कोणी असे म्हणेल, की काय अन्य लोक परमेश्वराशी आपले संबंध दृढ करण्यासाठी आपली नमाज पढत नाहीत का? माझे उत्तर हे आहे, की अजिबात नाही. जर आपण विचार केला, तर आपल्या लक्षात येईल की सद्यपरिस्थितीत दुर्दैवाने मुसलमांनामध्ये ही धारणा निर्माण झाली आहे, की परमेश्वराबरोबर थेट संबंध प्रस्थापित होऊच शकत नाही. मुसलमानांना सर्व साधारणपणे असे वाटते, की आज परमेश्वर आपल्या भक्तांशी बोलत नाही आणि भक्त देखील परमेश्वराकडून कुठलीही मनोकामना पूर्ण करून घेऊ शकत नाहीत. एक शतकापेक्षा अधिक काळ लोटला आहे, की मुसलमान परमेश्वराकडून संदेश अवतरित होतो, या गोष्टीला नकारत आले आहेत. निश्चितच यापूर्वी मुसलमानांमध्ये असे लोक होते जे परमेश्वरीय संदेश अवतरीत होतो ही गोष्ट मान्य करत होते. फक्त मान्यच करत नव्हते, तर ते असाही दावा करत होते, की परमेश्वर त्यांच्याशी संभाषण करतो. परंतु एक शतकापासून मुसलमानावर ही आपदा आली आहे की ते पूर्णपणे परमेश्वरीय संदेशाच्या अवतरण्याला नकारू लागले आहेत किंबहुना काहीं मौलवींनी तर या वस्तूस्थितीचा स्वीकार करण्याला श्रध्दाहीनता ठरवली आहे. हज़रत अपेक्षित मसीह(अ.स.) यांनी प्रकट होऊन जगासमोर हा दावा सादर केला, की परमेश्वर माझ्याशी संभाषण करतो आणि फक्त माझ्याशीच संभाषण करत नाही, तर जी व्यक्ति माझे अनुकरण करेल आणि माझ्या पदचिन्हांवर चालेल आणि माझ्या शिकवणुकीला मान्यता देईल आणि माझ्या उपदेशांचा स्वीकार करेल, त्याच्याशी देखील परमेश्वर संभाषण करेल. त्यांनी सतत जगासमोर ईश्वरीय संदेश सादर केले आणि आपल्या अनुयायींना प्रवृत्त केले, की

तुम्ही सुध्दा परमेश्वराच्या या बक्षीसांना प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील व्हा. त्यांनी म्हटले आहे, की मुसलमान पाच वेळा परमेश्वरापुढे प्रार्थना करतो की,

اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ

(फातिहा:६,७)

अर्थात- हे परमेश्वरा तू आम्हाला सन्मार्ग दाखव, अशा लोकांचा मार्ग ज्यांच्यावर तू कृपाप्रसाद अवतरीत केले होते; अर्थात पूर्व प्रेषित. मग हे कसे संभव आहे, की ही प्रार्थना नेहमीसाठी निष्फळ ठरवली जाईल आणि परमेश्वर मुसलमानांपैकी कोणावरही तो मार्ग उघड करणार नाही, जो पूर्वप्रेषितांसाठी उघड केला गेला होता. आणि कोणत्याही व्यक्तिबरोबर तसे संभाषण करणार नाही, जसे पूर्वीच्या प्रेषितांबरोबर करत होता. अशाप्रकारे त्यांनी मुसलमानांच्या ह्रदयात, जे शैथिल्य आणि जडत्व निर्माण झाले होते, ते पूर्णपणे नष्ट केले. मी असे म्हणत नाही, की प्रत्येक अहमदी, परंतु हे जरूर म्हणतो, की प्रत्येक तो अहमदी, जो हज़रत अपेक्षित मसीहांना पूर्णपणे समजून घेतले आहे तो नमाज त्या पध्दतीने अदा करत नाही जणू काही कर्तव्यपूर्ती करत आहे तर तो नमाज अशाप्रकारे अदा करतो जणू त्याने परमेश्वराकडून काहीं तरी प्राप्त करण्यासाठी गेला आहे. तो परमेश्वराबरोबर एक विशुध्द संबंध प्रस्थापित करण्यासाठी गेला आहे आणि या निश्चयासह जी व्यक्ति नमाज अदा करते त्या व्यक्तिची नमाज आणि दुसऱ्या लोकांची नमाज एकसमान नाही, हे लगेच लक्षात येते. त्यांनी परमेश्वराशी संबंध जोडण्यावर इतका भर दिला, की म्हटले की माझ्यावर श्रध्दा ठेवण्यासाठी परमेश्वराने अनेक संकेत दिले आहेत; परंतु मी तुम्हाला असे म्हणत नाही, की तुम्ही त्या संकेतांवर आणि पुराव्यांवर विचार करा. जर तुम्हाला असे वाटते, की या संकेतांवर आणि पुराव्यांवर चिंतन मनन करण्यासाठी तुम्हाला वेळ मिळत नाही किंवा याची तुम्हाला आवश्यकता वाटत नाही किंवा तुम्ही

असा विचार करता, की तुमची बुध्दीमत्ता या गोष्टींच्या संदर्भात निर्णय करण्याच्या बाबतीत चुकू शकते, तर मी तुम्हाला या गोष्टीकडे ध्यान देण्यास आवाहन करतो, की तुम्ही परमेश्वराकडे माझ्या संदर्भात प्रार्थना करा आणि परमेश्वराकडून मार्गदर्शन मागा, की जर हा सच्चा आहे तर आम्हाला खरा मार्ग दाखव आणि जर हा लबाड आहे तर आम्हाला याच्या पासून परावृत्त कर. आणि म्हटले, की जर एखादी व्यक्ति विशुध्द बुध्दीने आणि निरपेक्षपणे काहीं दिवस अशा पध्दतीने प्रार्थना करेल तर परमेश्वर त्याला निश्चितच सन्मार्गाचे दर्शन घडवेल आणि माझी सत्यता त्याच्यावर प्रकाशमान होईल. शेकडो नाही तर हजारो लोक असे आहेत, की ज्यांनी अशा पध्दतीने परमेश्वराकडून प्रकाश प्राप्त केला आहे. हा किती तेजस्वी पुरावा आहे. मानव आपल्या बुध्दीमत्तेमुळे चूक करू शकतो; परंतु परमेश्वर आपल्या मार्गदर्शनामध्ये चूक करू शकत नाही आणि ज्या व्यक्तिला स्वत:च्या सत्यतेबद्दल किती विश्वास आहे, जो आपल्या सत्यतेची पारख करण्यासाठी अशा प्रकारचा निर्णय जगासमोर सादर करतो आहे. काय एखादी लबाड व्यक्ति असे म्हणू शकते, की जा आणि परमेश्वराकडे माझ्या संदर्भात विचारणा करा? काय एखादी लबाड व्यक्ति असा विचार करू शकते, की अशा प्रकारचा निर्णय माझ्या बाजूनेच लागेल? जी व्यक्ति परमेश्वराकडून नाही, परंतु अशा प्रकारच्या निर्णयाला स्वीकार करते, ती जणू स्वत:च स्वत:विरूध्द निवाडा देत असते. आणि आपल्या हाताने आपल्या पायावर कुऱ्हाड मारत असते. परंतु हज़रत अपेक्षित मसीह यांनी नेहमीच जगासमोर ही गोष्ट सादर केली, की माझ्याकडे हजारो पुरावे आणि संकेत आहेत परंतु मी असे म्हणतो, की जर तुमचे हे पुरावे पाहून समाधान होत नसेल, तर माझेही ऐकू नका आणि माझ्या विरोधकांचेही ऐकू नका. परमेश्वराकडे जा आणि विचारा, की मी सत्यावर आहे की लबाड आहे. जर परमेश्वर म्हणेल की मी लबाड आहे, तर नि:संशय मी लबाड आहे. परंतु जर परमेश्वर म्हणेल की मी सच्चा आहे तर मग माझा स्वीकार करण्यात

तुम्हाला काय अडचण आहे?

हे प्रियजनहो! हा किती सरळ आणि रास्त मार्ग, निर्णय करण्याचा आहे. हजारो लोकांनी या पासून लाभ उचलला आणि ते सर्व लोक, जे अशा पध्दतीने निर्णय करण्याला मान्यता देतील, ते या पासून लाभन्वित होऊ शकतात. निर्णयाच्या या पध्दतीमध्ये वास्तविक पाहता हीच तार्किकता होती, की ते असे समजत होते, की धार्मिकता भौतिकतेवर प्रभावी आहे. ते म्हणत होते, की परमेश्वराने भौतिक वस्तूंना पाहण्यासाठी डोळे दिले आहेत, भौतिक वस्तूंना समजण्यासाठी बुध्दी दिली आहे आणि भौतिक गोष्टींना दाखवण्यासाठी त्याने आपला सूर्य निर्माण केला आहे आणि तारका निर्माण केल्या आहेत. मग हे कसे शक्य आहे, की आध्यात्मिक सन्मार्गांना दाखवण्यासाठी त्याने कोणताच मार्ग निश्चित केला नाही. निश्चितपणे जेव्हा कोणीही व्यक्ति त्याच्याकडे या आध्यात्मिक गोष्टींना पाहण्याची इच्छा प्रदर्शित करते, तेव्हा परमेश्वर त्याच्यासाठी मार्ग उपलब्ध करून देतो, तो स्वत:च पवित्र कुरआना मध्ये म्हणतो,

وَالَّذِيْنَ جَاهَدُوْا فِيْنَا لَنَهْدِيَنَّهُمْ سُبُلَنَا وَاِنَّ اللّٰهَ لَمَعَ الْمُحْسِنِيْنَ

(अल अन्कबूत:७०)

अर्थात- जे कोणी लोक आमच्या भेटीची अभिलाषा बाळगत प्रयत्नांची पराकाष्ठा करतात आम्ही त्यांना निश्चितच आपला मार्ग दाखवतो.

या सर्व लेखाचा सारांश असा आहे, की हज़रत अपेक्षित मसीह (अ.स.) यांनी धार्मिकतेला भौतिकतेवर प्राधान्य देण्याचा मार्ग आपल्या जमाअतसाठीही उघडला आणि आपल्या विरोधकांच्या समोर देखील हाच मार्ग सादर केला. आमचा परमेश्वर एक सजीव परमेश्वर आहे, तो आज देखील सृष्टीचा कारभार चालवत आहे. जगाचाही आणि धर्माचाही. एक श्रध्दावानासाठी हे आवश्यक आहे, की त्याने त्याच्याशी

अधिकाधिक संबंध जोडावा आणि त्याच्याशी जवळीक निर्माण करावी. आणि त्या व्यक्तिसाठी, ज्याच्यावर सन्मार्ग प्रकट झाला नाही, त्याच्यासाठी आवश्यक आहे, की त्याने परमेश्वराकडूनच प्रकाशाची इच्छा बाळगावी आणि त्याच्याच सहाय्याने सत्यतेपर्यंत पोहचण्याचे प्रयत्न करावे. म्हणून मूलकार्य आणि मूळसंदेश हज़रत अपेक्षित मसीहांचा हाच होता, की ते जगाचे प्रबोधन करीत मानवमात्रांना पुन्हा परमेश्वराकडे घेवून जावे आणि जे लोक परमेश्वराच्या भेटीपासून निराश झाले आहेत त्यांच्या हृदयामध्ये परमेश्वराच्या भेटीचा विश्वास निर्माण करावा आणि या प्रकारच्या जीवनाची प्रचिती द्यावी जी मूसा आणि ईसा(अ.स.) आणि अन्य प्रेषितांच्या काळातील लोकांना प्राप्त होती.

हे प्रिय जनहो! जुणे ग्रंथ वाचून पहा मग आपल्या पुर्वजांचा इतिहास पहा. काय त्यांचे जीवन भौतिक होते? काय त्यांचे कार्य फक्त भौतिक मार्गाने चालत होते? ते लोक परमेश्वराचे प्रेम प्राप्त करण्यासाठी रात्रंदिवस बेचैन होते आणि त्यांच्यापैकी यशस्वी होणारे लोक परमेश्वराकडून चमत्कार आणि संकेत प्राप्त करत होते. आणि हेच ते जीवन होते, जे त्यांना अन्य वंशाच्या लोकांपासून विशेषत्वाने भिन्न करून दाखवत होते. परंतु आज ते कोणते वैशिष्ट आहे, जे मुसलमानांना हिन्दू आणि ख्रिस्ती आणि दुसऱ्या वंशाच्या लोकांच्या विरूध्द प्राप्त आहे. जर असे कोणतेही वैशिष्ट नसेल, तर मग इस्लामची काय आवश्यकता आहे? परंतु वस्तुस्थिती अशी आहे, की वैशिष्ट तर आहेत परंतु मुसलमानांना त्याचा विसर पडला आहे आणि ते वैशिष्ट असे आहे, की इस्लाममध्ये नेहमीसाठी परमेश्वराचा संदेश जारी आहे आणि नेहमीच परमेश्वराशी थेट संबंध स्थापन केला जाऊ शकतो. पवित्र पैगंबर (स.) यांच्या कृपाप्रसादाचा हाच तर अर्थ आहे. त्यांच्या कृपाप्रसादाचा हा अर्थ तर असू शकत नाही, की आम्ही बी.ए किंवा एम.ए ची परीक्षा पास करावी, काय एक ख्रिस्ती बी.ए. किवा एम.ए. पास होवू शकत नाही. त्यांच्या कृपाप्रसादाचा हा अर्थ तर नाही, की

आम्ही एखादा मोठा कारखाना निर्माण केला आहे. काय ख्रिस्ती आणि हिन्दू आणि शिख असे कारखाने चालवत नाहीत, त्यांच्या कृपाप्रसादाचा असा अर्थ तर होऊ शकत नाही, की आम्ही एखादा मोठा व्यापारी संकुल निर्माण केला आहे. आणि दूर देशांशी आम्ही व्यापारी संबंध निर्माण केले आहेत हे देखील सर्व हिन्दू ख्रिस्ती आणि यहुदी करत आहेत. हज़रत महंमद (स.) यांच्या कृपाप्रसादांचा हाच अर्थ आहे, की त्यांच्या मार्फत मानव परमेश्वराबरोबर थेट संबंध प्रस्थापित करू शकतो. मानवी हृदय परमेश्वराला पाहू शकेल, त्याची आत्मा परमेश्वराशी सलग्न होईल, तो त्याचा मधुर संदेश ऐकू शकेल, परमेश्वराचे नवनवीन संकेत आणि पवित्र संकेत त्याच्यावर प्रकट होतील. ही ती गोष्ट आहे जी महंमद पैगंबर (स.) यांच्या गुलामी शिवाय कोणत्याही व्यक्तिला जगामध्ये प्राप्त होवू शकत नाही. आणि हीच ती गोष्ट आहे जी महंमद (स.) यांच्या अनुयायांनी दुसऱ्या वंशाच्या लोकांपासून वेगळी ठरवते. म्हणून याच गोष्टींकडे अपेक्षित मसीहींनी मुसलमानांचे ध्यान आकर्शित केले आणि हीच गोष्ट त्यांनी, त्यांना नकारण्याच्या सादर समोर केली, की परमश्वराने हा हरवलेला मोती मला प्रदान केला आहे. ही नष्ट झालेली संपत्ती मला प्रदान केली आहे. आणि हे सर्व काही मला महंमद (स.) यांच्या मार्गाने आणि त्यांचे अनुकरण केल्याने प्राप्त झाली आहे. आणि या पदावर मी त्यांच्या कृपाप्रसादानेच विराजमान आहे. याशिवाय अन्य अनेक कार्य हज़रत अपेक्षित मसीह यांनी केले, परंतु ते सर्व कार्य जुज्बी प्रकारचे आहेत जरी ते फार महत्त्वाचे आणि भव्य असे आहेत. परंतु मूळ कार्य हेच होते, की त्यांनी धार्मिकतेला भौतिकतेवर प्राधान्य देण्यासाठी आणि भौतिकतेवर आध्यात्मिकतेला प्रभावी करण्याची मोहिम सुरू केली आणि निश्चितच इस्लामला अन्य धर्मांवर याच मार्गाने प्रभुत्त्व प्राप्त होईल. आम्ही तोफांच्या आणि बदुकींच्या सहाय्याने आपल्या देशांचे रक्षण करू. आम्ही काहीं शत्रुंवर या साधनांच्या सहाय्याने प्रभुत्त्वही प्राप्त करू. परंतु इस्लामला संपूर्ण जगावर जे प्रभुत्त्व प्राप्त होणार आहे, ते

याच आध्यात्मिक मार्गावरून होणार आहे, ज्याच्याकडे अपेक्षित मसीह यांनी ध्यानाकर्शित केले आहे. जेव्हा मुसलमान मुसलमान होईल, जेव्हा तो धर्माला भौतिकतेवर प्राधान्य देवू लागेल, जेव्हा तो आध्यात्मिक गोष्टींना भौतिक गोष्टींवर प्रभावी मानू लागेल तर ते ऐशआरामाचे जीवन जे या काळात पाश्चिमात्य लोकांच्या माध्यमातून आमच्या देशात प्रस्थापित होत आहे, ते आपोआप नष्ट होईल आणि मानव कोणाच्या तरी सांगण्यावरून नाही, तर स्वतःच आपल्या इच्छेने गुलछबू वृत्तीचा त्याग करेल आणि गंभीर जीवन जगू लागेल. आणि त्याच्या वाणींमध्ये प्रभाव निर्माण होईल. आणि त्याचा शेजारी त्याचा रंग स्वीकारू लागेल आणि ख्रिस्ती व हिन्दू आणि दुसऱ्या धर्माचे लोक देखील, त्याचप्रमाणे जसे मक्केतील लोकांनी म्हटले होते,

لَوْ كَانُوْا مُسْلِمِيْنَ

(अल हिज्र:३)

अर्थात अरेरे! जर का आम्ही ही मुसलमान झालो असतो तर, असे म्हणू लागतील आणि अशा पध्दतीने हळू हळू त्यांचे हे वचन मक्काच्या लोकांप्रमाणे कृतीमध्ये बदलून जाईल आणि ते मुसलमान होतील. कारण कोणीही व्यक्ति अधिक काळापर्यंत चांगल्या गोष्टींपासून दूर राहू शकत नाही. सुरूवातीला आकर्षण निर्माण होते, मग अभिलाषा निर्माण होते, मग प्रयत्ने सुरू होतात आणि सरतेशेवटी मनुष्य या गोष्टीकडे आपोआप ओढला जातो. हेच आताही होईल. सुरूवातीला इस्लाम लोकांच्या हृदयामध्ये प्रस्थापित होईल, मग तो त्यांच्या शरीरांवर दिसून येईल, मग बिगर मुस्लिम लोक आपोआप अशा परिपूर्ण मुसलमानांचे अनुकरण करायला तयार होतील आणि जग मुसलमानांनी व्याप्त होवून जाईल आणि इस्लाममय होईल.

म्हणून हे प्रिय जनहो! या छोट्याशा लेखामध्ये मी सविस्तरपणे सर्व पुरावे आणि साक्षी नमूद करू शकत नाही आणि अहमदियतच्या

संदेशाच्या सर्व बारकाव्यांना तुमच्या समोर सादर करू शकत नाही. मी संक्षिप्त रूपाने अहमदियतचा संदेश आणि त्याचा हेतू ठेवला आहे. मी तुम्हला विनंती करतो, की तुम्ही या लेखावर विचार करावा आणि मनन करावं, की जगामध्ये कधीही धार्मिक चळवळी फक्त भौतिक साधनांने यशस्वी होत नसतात. धार्मिक चळवळी, मानसिक प्रबोधन आणि बलीदानाच्या मार्गानेच नेहमी यशस्वी होत राहिल्या आहेत. आदमच्या काळापासून आजपर्यंत जे झाले नाही ते आताही होणार नाही ज्या मार्गाने आजपर्यंत परमेश्वराचा संदेश प्रसारित झाला आहे, त्याच पध्दतीने आता देखील महंमद (स.) यांचा संदेश जगामध्ये प्रसारित होईल.

म्हणून आपल्या जीवांवर दया करत, आपल्या संततीवर दया करत, आपल्या घराण्यांवर आणि आपल्या समाजावर दया करत, आपल्या देशावर दया करत, परमेश्वराचा संदेश ऐकून आणि समजून घेण्याचा प्रयत्न करा, जेणे करून परमेश्वराच्या कृपेचे द्वार तुमच्यावर लवकरात लवकर उघडले जाईल आणि इस्लामची प्रगती मागे पडत जाणार नाही. अजून पुष्कळ कामे आहेत, जी आम्हाला करायची आहेत; परंतु त्यासाठी आम्ही तुमच्या आगमनाची प्रतीक्षा करत आहोत. कारण ईशवरीय प्रगती चमत्काराशिवाय देखील धर्माच्या प्रचाराशीही संबंधीत असते. तुम्ही या आणि हा भार आमच्या सोबत एकत्र येऊन उचला, जो भार उचलणे इस्लामच्या विकासासाठी आवश्यक आहे. निश्चित स्वरूपात त्याग आणि परोपकार तसेच अवहेलना आणि विपत्ती या सर्व गोष्टींचा सामना होणे आवश्यक आहे. परंतु परमेश्वराच्या मार्गात मरण येणे हेच वास्तविक जीवन आहे आणि या मरणाच्या स्वीकार केल्याशिवाय कोणीही व्यक्ति परमेश्वरापर्यंत पोहोचू शकत नाही. आणि या मरणाच्या स्वीकार केल्याशिवाय इस्लाम सुध्दा प्रभावी होवू शकत नाही. धाडस करा आणि मृत्युचा हा पेला तोंडाला लावा, जेणे करून

आमच्या आणि तुमच्या मृत्युने इस्लामला जीवन प्राप्त होईल आणि महंमद (स.) यांचा धर्म पुन्हा ताजा तवाना होईल आणि या मृत्युचा स्वीकार करून आम्ही सुध्दा आमच्या प्रियतमाच्या मांडीवर अमर्याद जीवनाचा आनंद घेत राहू.

आमीन.
मिर्ज़ा महमूद अहमद
इमाम, अहमदिया मस्लिम जमाअत,
२७, ऑक्टोबर १९४८ (अल् फजल ६ नोव्हेंबर१९४८)